# जगदंबा.

योगी श्री अरविंद
यांच्या
'मदर' या पुस्तकाचें
रूपांतर

भाई कोतवाल, इंदूर.

11005

# जगदंबा

" श्री अरविंद "

रूपांतरकार
भाई कोतवाल.

प्रकाशक व मुद्रक
रामचंद्र नारायण कुळकर्णी.
मॅनेजिंग डायरेक्टर
श्रीनाथ प्रेस लिमिटेड, इंदूर शहर.

किंमत ८ आणे

# प्रकाशकाचें प्रकाशन.

ही सुंदर लेखमाला आम्ही आत्मबोधांत प्रसिद्ध केल्यानंतर ती स्वतंत्ररूपानें प्रसिद्ध करावी अशा अनेक बंधूंकडून सूचना आल्यामुळें ती प्रसिद्ध करीत अहोत. आमचे सन्माननीय बंधु श्री. भाईसाहेब यांचा स्वार्थत्याग, दांडगी बुद्धिमता आणि अविश्रांत विद्याव्यासंग व स्वदेशाकरितां अनेक वेळा त्यांनीं सोसलेल्या यातना प्रसिद्ध आहेत. अशा खंद्या लेखकाकडून ही लेखमाला लिहिली गेली असल्यानें ती भाषांतरित मुळींच न वाटतां नैसर्गिकच वाहत आलेली ज्ञानगंगाच वाटते! आमचे विनंतीस मान देऊन श्री. भाईसाहेबांनीं ही माला प्रसिद्ध करण्यास दिली या बद्दल त्यांचे आभार मानून योगी अरविंद-बाबूंच्या दर्शनाचा लाभ जरी न घेतां आला तरी त्यांच्या लेख-सुधेचा आस्वाद सर्व बंधुभगिनींनीं घेऊन खरा परमार्थ साधावा अशी विनंति करणारा

—नाथांचा राम

# प्रास्ताविक.

शके १८५२ च्या आषाढ महिन्यांत अजमीर केंद्रीय कारावासांत इंग्रजी नोकरशाहीचा पाहुणचार खात असतां एका सहबंदीच्या हातांत एक लहानसें चोपडें दिसलें. काय आहे म्हणून पाहिलें तों बाबू अरविंदांचें ( Mother ) "जगदंबा" लगेंच वाचून काढलें. फार आवडलें. फुरसद होतीच. 'आत्मबोधा' च्या वाचक बंधू भगिनीसाठीं त्याचें मराठींत रूपांतर केलें. हें रूपांतर नव्हे. यांत एकहि भाव न सुटेल

अशी काळजी घेतली आहे. पण शब्दाला शब्द ठेवण्याची यातायात केलेली नाहीं. भाद्रपद अखेरीस पाहुणचाराचा काळ संपला. छोट्याशा बंदीखान्यांतून निघून दोन हजार मैल लांब व तितकाच रुंद अशा विस्तीर्ण बंदिवासांत येऊन दाखल झालों. तेव्हां हें पेन्सिलीचें टिपण शाईत लिहून काढून " आत्मबोधा " च्या संपादकांच्या हवालीं केलें. हेतु हा कीं, जो रसास्वाद मला मिष्ट वाटला तो माझ्या महाराष्ट्रीय बंधु भगिनींनां पण चाखतां यावा. त्यांना सुद्धां तो तसाच मिष्ट व मधुर वाटेल अशी अपेक्षा आहे.

मूळ ग्रंथ इंग्रजींत आहे. त्या भाषेवरील अरविंदबाबूंचें प्रभुत्व जगजाहीर आहे. त्या भाषेची गोडी रूपांतरांत आणणें शक्य नाहीं. तथापि त्यांतील भाव सुद्धां तितकेच उदात्त व चित्ताकर्षक. ते तसेच या रूपांतरांत उतरले असतील अशी आशा आहे. भाषासौंदर्याच्या उणीवेची जाणीव आहे; म्हणून त्याबद्दल वाचकांनीं क्षमा करावी इतकेंच सांगावयाचें.

—भाई कोतवाल.



योगी श्री अरविंदघोष.

॥ श्री ॥

# " जगदंबा "

१

मानवी जीवन सफल करणें अर्थात् जन्मास आल्याचें सार्थक्य करणें हेंच मनुष्यमात्राचें सतत ध्येय असतें. हें ध्येय साध्य करणें जितकें महत्वाचें व अगत्याचें आहे तितकेंच तें दुर्लभ व कष्टसाध्य आहे. तें हस्तगत होण्याचे दोनच मार्ग आहेत. एक मानवी आकांक्षांचें सातत्य व दुसरा ईश्वरी प्रसाद. ध्येय प्राप्तीचें नित्य चिंतन करणें, तन्निमित्त सदा प्रयत्नशील राहणें व प्रयत्न यशस्वी व्हावेत, चिंता दूर व्हावी म्हणून अहर्निश ईश्वराची करुणा भाकणें हा मानवी पंथ; आणि दयाघन परमेश्वरानें कृपावंत होऊन, भक्ताची आर्तता पाहून, त्याजवर प्रसन्न होणें, ध्येय प्राप्त्यर्थ उचित मार्गाचें त्याच्या

चित्तांत प्रस्फुरण करणें व ध्येयसिद्धीचा प्रसाद त्याच्यावर वर्षविणें हा दैवी पंथ. हे दोन्ही पंथ एकवटले व त्यांचा संयोग झाला म्हणजेच ध्येयप्राप्ति होते व मग ध्येय, ध्याता, ध्यान सर्व एकरूप होतात. दोन्ही मार्ग शक्तिस्वरुप आहेत. या दोन शक्तींच्या ऐक्यामध्येंच जीविताची सार्थकता वसत आहे. अर्थात् मानवी प्रयत्नांची आटोकाट उत्कटता व दैवी प्रसादाची अमोघ वृष्टि यांचा संयोग झाला म्हणजेच ध्येयप्राप्ति होते व जीवन सफल होतें.

२ परंतु ईश्वरीप्रसाद जेथें सत्य व ज्ञान असेल तेथेंच होतो. अज्ञान किंवा मिथ्यता यांच्या सांनिध्यांत ईश्वरीप्रसाद चुकून सुद्धां फिरकत नाहीं. सत्य व ज्ञान सोडून असत्य व अज्ञान यांच्या आश्रयानें प्राप्त होणारी क्षणभंगुर सिद्धि ईश्वरीप्रसाद नव्हे. ईश्वरीप्रसाद सदा सर्वदा ज्ञानगम्य व सत्योपवासी असतो.

३ केवळ ज्ञान किंवा केवळ सत्य यानें ईश्वरीप्रसादाचें आकर्षण होत नाहीं. तें सत्य व तें ज्ञान विशिष्ट परिस्थितींतच असावें लागतें. तेव्हांच त्यांना ईश्वरी प्रसादाकर्षक होतां येतें. वाटेल तो लोखंडाचा तुकडा लोहचुंबक होत नाहीं. त्याच्या मध्यें कांहीं वैशिष्ट्य आल्यावरच तो लोहचुंबक होतो. तद्वतच शुद्ध ज्ञान व सत्य यांची गोष्ट आहे.

४ ही ज्ञानाची व सत्याची विशिष्ट परिस्थिति चतुर्विध आहे. प्रथम तर श्रद्धामय अंतःकरणापासून संपूर्ण आत्मार्पण झालें पाहिजे. नंतर ज्या दैवी शक्तीच्या प्रसादाची अपेक्षा असेल त्या दैवी शक्तीशीं नित्य निष्कपटपणें आत्मनिवेदनहि झालें पाहिजे पण इतक्यानेंच भागत नाहीं; तर त्याबरोबरच पदोपदीं, क्षणोक्षणीं, निरपेक्ष सत्याची कास बळकट धरून ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न सतत होत असला

पाहिजे. आणि त्याचप्रमाणें या ऐहिक सृष्टींत किती तरी शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक शक्तिदेवतांचा स्वाभाविक संचार होत असतो. रिद्धिसिद्धींचा नाचरंग सारखा चालत असतो. त्यामुळें मानवी जीवाच्या सभोंवार चित्ताकर्षक प्रबल प्रलोभनांचें घनदाट वातावरण पसरलेलें असतें. त्याचें मिथ्यत्व व नश्वरत्व ध्यानीं आणून त्यांचा मनोभावें कंटाळा वाटला पाहिजे व त्यांपासून सदा सावधपणें व चिरदक्षतेनें परावृत्त होण्याचा सुद्धां तितकाच आटोकाट प्रयत्न झाला पाहिजे. या चतुरंग परिस्थितींतच ज्या वेळीं सत्य व ज्ञान यांचा अनन्य आश्रय घेण्यांत येतो तेव्हांच तें ज्ञान व तें सत्य ईश्वरीप्रसादाकर्षक होतें; आणि जेव्हां खालून मानवी जीव अंतःकरणपूर्वक अनन्य भक्तीनें परमेश्वराला आळवून त्याची करुणा भाकतो, आणि वरून परमात्मा कृपार्द्र होऊन ऐश्वरीय प्रसादामृताचा वर्षाव करतो, तेव्हांच या भौतिक जीवाच्या साऱ्या आपत्ती दूर होतात आणि मानवी जीवन सुखमय, शांतिमय, व आनंदमय अर्थात् सार्थ होतें. तेव्हांच मनुष्य भवसागर तरून गेला असें म्हणतात. तेव्हांच मनुष्यानें जीविताचें सार्थक्य केलें असें होतें.

५ आत्मार्पण, आत्मनिवेदन, सत्यनिष्ठा व मोहनिवृत्ति हीं चतुर्विध साधनें आत्मसात् केल्यानेंच ईश्वरीप्रसादप्राप्तीची पात्रता येते; आत्मार्पण अगदीं संपूर्ण पाहिजे ह्मणजे जीवनचर्येंतील प्रत्येक अंगास व्यापून टाकणारें, निःशेषपणें अंगअंग, प्रत्यंगोपांगाचा परिपूर्ण समावेश करणारें असेंच आत्मार्पण झालें पाहिजे. केवळ आत्म्याला प्रचीति आली ह्मणून, आध्यात्मिकदृष्ट्या आत्मार्पण करण्याची तयारी ठेविली व अंतःकरणाची प्रवृत्ति त्या दिशेकडे वळविली तर काम होणार नाहीं; किंवा केवळ बुद्धीला खूण पटली व मानसिक विचारावर त्याची छाप पडून त्या धोरणानें विचार व उच्चार व मधूनमधून

आचार पण होऊं लागले तरी मुद्धां कार्य भाग साधणार नाहीं. ऐहिक जीवनक्रम व आध्यात्मिक जीवनचर्या यापैकीं कोणत्याहि भागांत कोणत्याहि प्रकारें कुचरपणानें एकाद्या अंगालाच काय पण उपांगाला सुद्धां चोरून ठेवतां कामा नये; मग तें उपांग कितीहि क्षुद्र असो वा निरर्थक दिसो; जेथें ह्मणून संशयाचा शिरकाव होईल, जेथें जेथें वैकल्याचा प्रादुर्भाव होईल, जेथें जेथें आत्मप्रतारणेची छटा उमटेल, जेथें जेथें प्रतिकाराचा वारा वाहील, जेथें जेथें प्रत्याघाताला थारा मिळेल, तेथें तेथें अविश्वास, अश्रद्धा, अज्ञान व संशय हीं घर करून वसतील. आणि मग " अज्ञश्चाश्रद्धधानश्च संशयात्मा विनश्यति " या भगवदुक्तीप्रमाणें निश्चित परिणाम घडून येतील हें सांगावयाला नकोच.

६ मानवी जीवनांतील एक अंग आत्मार्पण–परायण होईल आणि दुसरें चुकारपण करून तें टाळील व आपल्या तंत्रानें चालूं पाहील, आणि स्वेच्छानुकूल परिस्थिति घडवून आणण्याच्या खटपटींत राहील तर प्रत्येक वेळेस आत्मार्पणानें ओढला जाणारा ईश्वरीप्रसाद त्या स्वैराचारानें दुप्पट दूर भिरकाविला जाईल यांत संदेह नाहीं.

७ मनुष्य जर केवळ आपल्या वासनापूर्तीसाठीं किंवा ईप्सित प्राप्त्यर्थ भक्तीचें पांघरूण घेईल, अथवा आत्मार्पणाचें ढोंग करील तर मग त्यानें ईश्वरीप्रसादाची अपेक्षा करणें व्यर्थच नव्हे तर दांभिक होय. त्याचप्रमाणें मानवी सदाकांक्षांना व सद्धेतूंना दूर सारून त्या ठिकाणीं मनुष्य आपल्या स्वार्थमूलक अपेक्षा व ऐहिक आवश्यकता यांचें प्रस्थान ठेवील व ईशप्रसादाची प्राप्ति व्हावी ह्मणून करुणा भाकील, किंवा क्वचित् प्रसंगीं त्या आकांक्षा व हेतू आणि त्या अपेक्षा व आवश्यकता यांची सरमिसळ करून घड ना हें व घड ना तें, अशा

चंचल, द्विधा स्थितींत ईश चरणीं लीन होण्याचा आव आणील व ईश्वरीप्रसाद मिळावा ह्मणून सारे प्रयत्न करीत राहील व त्यासाठीं दैवी शक्तीच्या साह्याची आशा बाळगील तर तीच शक्तिदेवता त्याच्या दंभाचा परिस्फोट केल्याविना राहणार नाहीं. ह्मणून अशा तुटपुंज्या किंवा भेसळ आत्मार्पणानें ईश्वरीप्रसादाची आशा करीत बसणें निरर्थक होय. सारांश, आत्मार्पण संपूर्ण पाहिजे, निष्कपट पाहिजे, निरलस पाहिजे; आणि मग अशा परिपूर्ण, 'कपटरहित,' आलस्य-शून्य आत्मार्पणपूर्वक ईशचरणीं जें आत्मनिवेदन होईल तें प्रबल, उत्कट व अनन्य होईल. त्या आत्मनिवेदनांत परमेश्वराची जी आळवणूक होईल, जी करुणा भाकण्यांत येईल, ती निःसंशय ईशप्रसादाकर्षक होईल.

८ तसेंच मनुष्य जर एका दिशेनें सत्याला आमंत्रण देईल व दुसऱ्या दिशेनें तद्विरोधकांना खुणावीत राहील तर ईश्वरीप्रसादाचा वर्षाव होईल किंवा आपल्या ठायीं त्याचा निवास होईल असें समजणें चुकीचेंच नव्हे तर भ्रामक होय. मानवी शरीर हें ईश्वरी मंदिर आहे. तें मंदिर शुद्ध, पवित्र व सदा पुनीत ठेविलें पाहिजे. त्याला कोणताहि विटाळ होऊं देतां कामा नये. तेथें सत्याचा धूप सतत जळत ठेविला पाहिजे. त्या योगेंच असत्य वातावरण नष्ट होईल. सर्वत्र शुद्धि, पावित्र्य व पुण्यता यांचाच संचार होईल. तसें झालें ह्मणजेच तेथें ईशप्रसादाची प्राणप्रतिष्ठा करतां येईल; अन्यथा ती गोष्ट असंभवनीयच नव्हे तर अशक्य होय हें लक्षांत ठेवावें.

९ दैवी शक्ति सदा जागरूक आहे. ती मनुष्याला पदोपदीं सत्याची आठवण देत असते. पण मनुष्यच जर गाफिलपणानें किंवा अंध होऊन तिकडे काणा डोळा करील किंवा जाणून बुजून दुर्लक्षच

करील तर तो निःसंशय दुःखी व पतित होईल. पण तो दोष दैवी शक्तीचा नव्हे. स्वतःच्या स्वैरवृत्तीला वेळींच आळा न घातल्यानें, आपली मनःप्रवृत्ति निष्कपट न ठेविल्यानें, सत्याच्या हाकेकडे दुर्लक्ष केल्यानें व ईशप्रात प्रसादाचा अव्हेर केल्यानें मनुष्यच स्वतःच्या पतनाचें आणि दुःखाचें निमित्त होतो. " नादत्ते कस्यचित्पापं न चैव सुकृतं विभुः " आणि ' आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः ' हें निर्विवाद व त्रिकालाबाधित होय.

१० मनोभावें सत्याराधना करीत असतांहि जर अज्ञानमूलक, मिथ्यापूर्ण वा स्वार्थपर प्रवृत्तीकडे तुमच्या मनाचा ओढा एकाद्या क्षणीं असावधानतेनें गेला किंवा तशा मनःप्रवृत्तीकडे तुमच्याकडून ईषन्मात्र दुर्लक्ष झालें तर लगेच तुमच्या सत्याच्या अभेद्य कवचांत कोठें तरी भोंक पडेल, कांहीं तरी व्यंग राहील, आणि दुर्योधनाच्या मांड चोळण्यानें त्याच्या विनाशास जसें स्थान करून ठेविलें, तद्वत् तुमच्या विनाशाला तुम्ही स्थान करून ठेवाल आणि मग ईश्वराच्या नांवानें खडे फोडीत रहाल व त्या बिचाऱ्या पंगु दैवाला निष्कारण दोष देत बसाल; पण तें योग्य होणार नाहीं. म्हणून सदा दक्ष व तत्पर राहून आपल्या ठायीं सुप्त, गुप्त वा लुप्त असत्य काय आहे, किती आहे, कसें आहे, कोठें आहे, याचा सारखा तपास करीत रहा आणि क्षणोक्षणीं, पदोपदीं, त्याला हुसकावून लावण्याचा सतत प्रयत्न करा. तेव्हांच अनन्य भक्ति कशाला म्हणतात तें तुम्हाला उमजेल. आणि मग त्या भक्तीच्या जोरावर ईशप्रसादाचा मेघ तुम्हाला आपल्याकडे वळवून घेतां येईल.

११ सत्य व असत्य, प्रकाश व अंधःकार, आत्मार्पण व स्वार्थापेक्षां आदि द्वंद्वें या मानवी देहरूपी ईशमंदिरांत एकसमयावच्छेदें

करून वास करूं शकतील ही कल्पना सुद्धां तुमच्या अंतःकरणास शिवूं देऊं नका. जर ईशप्रसाद पाहिजे असेल तर भक्ति अनन्य व अव्यभिचारी असली पाहिजे; सतत सत्यान्वेषी व सत्यावलंबी झालें पाहिजे. संपूर्ण व निष्कपट आत्मार्पण केलें पाहिजे; निर्विशेष व निरलस आत्मनिवेदन झालें पाहिजे.

१२ ईश्वरनिर्मित अर्थात् निसर्गसिद्ध जे नियम आहेत त्यांना धाब्यावर बसवून किंवा त्यांच्या परिपालनांत स्वैर परिवर्तन करून अथवा आपल्या इच्छेस येईल तसें व तेव्हां त्यांचें पालन करून कार्यभाग सिद्ध होत नाहीं, झाला नाहीं व कधींहि होणार नाहीं. म्हणून तशी वृत्ति ठेवून सुद्धां तशा प्रकारें धरसोडीचें वर्तन केलें तरी देखील ईश्वरी प्रसाद लाभेल या भ्रामक कल्पनेला बळी पडून आत्मवंचना करून घेऊं नका. ईश्वर दयासागर आहे. तेथें, करुणा भाकण्याची एक घागर टाकिली कीं आली ती भरून; अशी वेडगळ, मिथ्या समजूत करून घेऊं नका. जोंपर्यंत तुमचें स्वात्मार्पण संपूर्ण नाहीं, तुमचें आत्मनिवेदन कपटरहित नाहीं, तों पर्यंत तुह्मी कितीहि आक्रोश करून त्या दयाघन प्रभूला आळविलें तरी तो तुमच्याकडे ढुंकून सुद्धां पहाणार नाहीं. तो अनन्य भक्तीचा भुकेला आहे. ती पोहोंचली की त्याच्या कडून परत पावती ही ठेवलेलीच.

१३ त्याच प्रमाणें ही आत्मार्पणाची तयारी व ही आत्मनिवेदनाची खटपट तुमच्या करितां तो परमात्मा करील ही आलस्यमूलक व भ्रमनिदर्शक अपेक्षा मुळीं सुद्धां ठेवूं नका. "असेल माझा हरि तर देईल खाटल्यावरी" ही भावना शुद्ध होण्यासाठीं किती तरी काट्यांतून मार्ग काढावा लागतो. अशुद्ध भावना सदा वांझ असते व प्रसविलीच तर कटु फळेंच प्रसवते. परमात्म्याला समर्पण पाहिजे.

पण त्यासाठीं तो तुमच्यावर जबरदस्ती करीत नाहीं. जोंपर्यंत तुम्ही स्वतः होऊन तें करणार नाहीं तोंपर्यंत तो त्या संबधांत तुह्माला कोणतेहि प्रकारची साह्यता देणार नाहीं. तुमच्या मनास येईल तसें करण्यास व आचरण्यास तुह्मी मुखत्यार आहां. तुह्माला पूर्ण मोकळीक आहे. तुह्मी त्याच्याकडे जाण्याचा मार्ग धरा किंवा त्याच्यापासून दुरावण्याचा रस्ता पत्करा. तुमच्या करणींचें व तुमच्या आचरणाचें फल तुमचें तुह्मालाच भोगावें लागलें. त्यांत दुसरा कोणीही भागीदार होणार नाहीं. तुमचें आत्मार्पण व आत्मनिवेदन संपूर्ण पाहिजे इतकेंच नव्हें तर तें खुल्या दिलानें, आपखुशीनेंच झालें पाहिजे. त्यांत परावलंबनाचा, परनियंत्रणाचा, गंध सुद्धां येत कामा नये. मोकळ्या मनानें, स्वेच्छेनें केलेलें अर्पण व निवेदन जर सर्वांगपरिपूर्ण, निर्विकल्प, निष्कपट, निरवशेष व निरलस असेल तरच ईश्वरी सूत्राचें टोंक तुम्हाला येऊन चिकटेल आणि मग तें तुह्मांला अशा रीतीनें नाचवील कीं मग तुम्हाला आपली स्वतःची अशी कोणतीहि पृथक् इच्छा राहणार नाहीं. जें जें कर्म घडेल तें तें सहज ईश्वरप्रेरित असेंच घडत जाईल. सारांश, तुमचें अर्पण व निवेदन एका जीवात्म्याचें, एका जिवंत मनुष्याचें, परमात्म्याशीं असलेला आपला पूर्वापर संबंध ओळखण्याऱ्या सुष्ट प्राण्याचें असलें पाहिजे. तें निर्जीव चक्राचें किंवा यांत्रिक क्रियेचें नसावें.

१४ पुष्कळ वेळां " आहे माझा भाव देईल देव " अशा बुद्धीनें आळशी होऊन स्वस्थ बसण्याच्या प्रवृत्तीलाच लोक आत्मार्पण समजतात. आणि आपली फसगत करून घेतात. त्यांच्या हें लक्षांतच येत नाहीं कीं निर्बुद्ध जडत्वापासून सजीव चैतन्याची निर्मिति होणें कधींच शक्य नाहीं. उलट या जडमूढ प्रवृत्तीमुळेंच इहलोकीं सर्वत्र दुःखाचे डोंगर दिसून येत आहेत. याच जडमूढतेंत अज्ञानाची, तमोमयतेची, प्रवृत्ति आहे. जेथें आत्मार्पण आनंदानें, उत्कटतेनें व

स्वाश्रयानें होतें, तेथेंच दैवी शक्तीचा प्रादुर्भाव होत असतो. सत्यान्वेषी व सत्यावलंबी, सत्यप्रेमी व सत्याग्रही अशा जिज्ञासूलाच ईशप्रसादानेंच ज्ञान होतें आणि त्या ज्ञानाच्या आधारानें तोच जेव्हां दृढनिश्चयानें पण नम्र भावानें त्या दैवीशक्तीची आराधना करतो तेव्हांच त्याच्या अंगांत त्या शक्तीचा संचार होतो आणि मग अज्ञानाला व मोहांधतेला झुगारून ईशप्रसादाच्या सेवनार्थ तत्पर होत्साता खऱ्या सेवावृत्तीनें तो ईशाज्ञांचें पालन करूं लागतो. अनन्यभक्तिपूर्ण अंतःकरणानें आत्मार्पण व आत्मनिवेदन करीत सत्याची कांस धरून तो या भवडोहांत उडी घेतो आणि ईशप्रसादाच्या दीपस्तंभाकडे झेंपावतो. त्या प्रसंगीं मोहाचे भोंवरें, मत्सराचे नक्र, दंभाचे खडक, कामाचे पाश, क्रोधाच्या लाटा, लोभाचे प्रवाह व मदाचें झंझावात त्याला त्याच्या मार्गावरून परावृत्त करूं शकत नाहींत. ईशशक्तीच्या संचारानें त्या सर्वांना टाळून ईशप्रसादाचा दीपस्तंभ तो गाठतो आणि प्रसाद-प्राप्तीचा परम पुरुषार्थ संपादून भवसागर पार होतो.

१५ ईशप्रसाद प्राप्तीचा हाच खरा एकमेव निश्चित मार्ग होय. जो कोणी या मार्गानें जाण्याचा प्रयत्न करील; निराशेला स्थान न देतां अचल श्रद्धेनें आपली वाट सारीत राहील, नानाविध अडचणींना ठोकर मारून अदम्य उत्साहानें पंथक्रमण करीत राहील तोच प्रयत्नाअंतीं परमेश्वर या न्यायानें अंतिम पदवी प्रत पोहोंचेल, व सत्याच्या विजयांत यशोभागी होईल; मनुष्यत्वाच्या पलीकडे जाईल; दैवी संपत्तीचा उपभोक्ता होईल; त्याजवर ईश्वर प्रसन्न होईल; सर्व रिद्धिसिद्धी त्याच्या दासी होतील. सारांश " शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नं " पासून प्रारंभ करून क्रमाक्रमानें " स्थितोऽस्मि गतसंदेहः करिष्ये वचनं तव " या अभीष्ट अंतिम स्थिती प्रत पोंचण्यांतच खरा पुरुषार्थ आहे.

# २

अखिल विश्वांत जी जी म्हणून क्रिया होते त्याच्या मूळाशीं दैवी शक्ति ही असतेच. परमेश्वर आपल्या दिव्य शक्तीच्या द्वारेंच प्रत्येक क्रिया घडवून आणीत असतो. परंतु प्रत्येक कृतींत तो सदैव व्यक्तच होतो असा नियम नाहीं. उलट बहुधा आपल्या योगमायेच्या आवरणांत लुप्त व लिप्त होत्साता तो जीवात्म्याच्या व प्रधानतत्वाच्या करवीं या निखिल चराचर जड चैतन्यमय सृष्टीचे व्यापार घडवून आणतो आणि सर्वकर्ता असून सुद्धां केवळ साक्षी, द्रष्टा, अकर्ता रूप होऊन बसतो.

२ परमेश्वरप्राप्तीसाठीं योगाची आवश्यकता असते. त्या योगांत सुद्धां साधक व त्याची साधना हीं त्याच परमशक्तीची अंगें होत. त्या शक्तीच्या तेजोमय प्रकाशानें, अतुल प्रभावानें, सर्वगामित्वानें, सर्वज्ञतेनें व विशेषतः सदानंदतेनें तो साधकरूपी आधारावर अधिष्ठित होतो व तो आधार योग्य रीतीनें विकास पावतांच तो आपल्या शक्तीचें महद्बीज त्याच्या ठायीं पेरतो, तेव्हांच त्याची साधना फलद्रूप होते. किन्तु जोंपर्यंत साधकाचा अहंभाव जागृत असतो, तोंपर्यंत त्याला सारखें सावध रहावें लागतें. त्यानें त्या अहंभावाचेंच योग्य नियंत्रण करून त्याच्या द्वाराच आपल्या आत्मविकासाचें साध्य हस्तगत करून घेतलें पाहिजे. मात्र त्यासाठीं साधकाचा प्रयत्न सतत चालू राहिला पाहिजे.

३ साधकाच्या प्रयत्नाच्या दिशा तीन होत. ( १ ) आकांक्षा व दक्षता, ( २ ) त्याग व उच्छेद ( ३ ) बलिदान व समर्पण. प्रथम **दक्षता व आकांक्षा** हीं सदा जागरूक, चौकस व अविरत असलीं पाहिजेत. मनाचा दृढनिश्चय, हृदयाची सतत तळमळ, जीवनसर्वस्व अर्पण करण्याची तयारी, व आपल्या शारीरिक बंधनानें व गुणधर्मानें आवृत अशा प्रकृतीची परमतत्व आकलन करण्याची उत्कट इच्छा व त्यासाठीं त्या प्रकृतीचें काठिण्य सोलून काढून तिच्या आंतील कोमल, मृदुल व सहजस्पर्शी गाभा उघडा करण्याची लालसा ही साधकाच्या प्रयत्नाची प्रथम दिशा होय. (२) द्वितीय **त्याग व उच्छेद** प्रकृतीधर्मानुसार उद्भवणाऱ्या प्रवृत्तींच्या वेगाचा उच्छेद. मनोमय कल्पना, विशिष्ट मतें, पूर्वग्रह, खास संवयी, कार्य रचना, आदि सर्वांचा पूर्ण उच्छेद होईल तेव्हांच सत्यज्ञानाचा आपल्या अंतर्यामीं प्रवेश होणें संभवनीय व शक्य आहे. जीवदशेंतील वासना, इच्छा,

आकांक्षा, विकार, संवेदना स्वार्थता, अहंता, आढ्यता, विलासप्रियता, लोलुपता, असूया, ईर्षा, द्वेषबुद्धि, वैरभाव इत्यादिकांचा पण तसाच उच्छेद झाला पाहिजे. तेव्हांच सच्छक्ति व सदानंद यांचा आपल्यावर प्रसाद होईल व आपल्या निर्मल, शांत, समर्थ, विस्तृत, विकसित व पुनीत अंतःकरणांत त्यायोगें आर्द्रता व प्रसन्नता उद्भवेल. आपलें अज्ञान, शंका, तर्क, वितर्क, मूढता, दुराग्रह, अल्पमति, आलस्य, निष्कर्मण्यता, दुर्मुखता, अनिच्छा आदि आदि तमोमय गुण धर्मांचा उच्छेद होईल, तेव्हांच आपलें हें देवमंदिर–शरीर–वास्तविक दिव्याधिष्ठानोचित होईल व त्यांत त्या सच्चिदानंद मूर्तींची प्राणप्रतिष्ठा करतां येईल. ही उच्छेदप्रवृत्ति साधकाच्या प्रयत्नाची द्वितीय दिशा होय. (३) तृतीय **बलिदान** व **समर्पण**. जें कांहीं आपलें आहे, किंबहुना जें कांहीं आपण आहोंत तें सारें जाणिव–नेणीवपूर्ण, कर्मपूर्ण, विचारपूर्ण, अवस्थापूर्ण सर्व कांहीं त्या परमेश्वराचें चरणीं अर्पण केल्याशिवाय त्याच्या दिव्य शक्तीचा संचार आपल्या ठायीं होणें शक्य नाहीं; फार काय पण यत्किंचित सुद्धां प्रसादप्राप्ति होणें दुर्घट होईल.

४ ज्या मानानें आत्मसमर्पणाचा व त्या बरोबरच आत्मसत्वसंशुद्धीचा विकास होत जातो, त्या मानानें साधकाला आपली साधना दिव्यशक्तीच्या प्रेरणेनें होत आहे व आपण केवळ एक कळसूत्री बाहुली प्रमाणें त्या सूत्रधाऱ्याच्या हातांतील दोऱ्यांवर नाचत आहोंत असा प्रत्यय येत जातो. त्या दैवीशक्तीचा प्रबल ओघ आपल्या ठायीं अधिकाधिक वेगवान व व्यापक आणि विस्तृत होत आहे व त्या दिव्य सत्तेची सर्वांगसुंदरता व परिपूर्ण स्वायत्तता दिवसेंदिवस अधिकाधिक स्पष्ट व अनुभवगम्य होत आहे अशी त्याला प्रतीति येते.

५ ही आत्मप्रतीति जितकी अधिक प्रगत व दृढ होईल तितकें त्याच्या स्वकृत प्रयत्नाचें मान कमी कमी होत जाईल. आणि त्याच प्रमाणांत त्याची उन्नति व उत्क्रांति अधिक सवेग व सार्थ होईल. परंतु आपल्या स्वतःवरचा अंकुश कधीं सुद्धां ढिला करतां कामा नये हें त्यानें केव्हांहि विसरतां कामा नये. जावत्काल त्याचें अथपासून इतिपर्यंत सारें जीवन, कर्ममय, ज्ञानमय, भक्तिमय संपूर्णतेनें पुनीत, दिव्यशक्तीनें संचरित आणि दैवी सत्तेनें प्रेरित व शुद्ध झालेलें नाहीं तावत्काल आपल्या स्वतःवरील देखरेख अविरल दक्षतेनें त्यानें ठेविली पाहिजे.

६ ह्या बरोबरच हें हि लक्ष्यांत ठेविलें पाहिजे कीं, केवळ तमोगुणमयी, अज्ञवृत्तिपूर्ण आत्मसमर्पण करून आळशासारखें स्वस्थ व निरुद्योगी राहून "आहे माझा भाव मग देईल देव" किंवा "आहे माझा हरी देईल खाटल्यावरी" असें तोंडानें बडबडत आणि जें कांहीं घडतें संवरतें त्याचा कर्ता करविता तोच परमेश आहे, त्याचें पापपुण्य त्याचें त्यालाच, मला काय त्याचें, असें वृथाच भ्रमांत पडून, पोकळ डौलानें, खोट्या समजुतीवर विश्वसून निष्क्रिय रहाणें व कोणताहि उद्योग न करणें, कसल्याहि उपक्रमास तयार न होणें व प्रयत्नशून्य होऊन स्वस्थ बसणें हीं अत्यंत मोठी आत्मवंचना होय. त्या योगें संपूर्णता किंवा स्वायत्तता कधींही प्राप्त होणार नाहीं; अर्थात् ईश प्रसादप्राप्तीचें मग नांवच कशाला घ्या. सारांश, जीवनसार्थक्यासाठीं, सफल जीवनचर्येसाठीं, पुरुषार्थसाधनासाठीं योगाची आवश्यकता आहे, हें जितकें खरें आहे, तितकेंच त्या योगासाठीं प्रयत्नशील रहाणें अगत्याचें आहे आणि त्या प्रयत्नाच्या पूर्वी सांगितलेल्या तीन्ही दिशा चोखाळल्याविना 'प्रयत्नाअंतीं परमेश्वर' या न्यायाची सत्यता व सार्थता पटणें शक्य नाहीं. ह्मणून प्रत्येकानें त्या दिशांनीं प्रयत्न करावेत. इति शं ।

## ३

या जगतीतलावर निःशंकपणें, निर्भयपणें व निर्धास्तपणें विहार व संचार करावयाचा असेल तर दोन गोष्टींची आवश्यकता असल्यानें त्या साध्य करून घेतल्या पाहिजेत. त्या दोन्ही गोष्टी सदा संबद्ध राहिल्या पाहिजेत व दोन्ही एक समयावच्छेदेंकरून होत गेल्या पाहिजेत. त्यांचा पृथक् पृथक् अभिसंचार होऊन कार्यभाग साधत नाहीं; त्यांपैकीं प्रथम व प्रधान गोष्ट 'जगदंबेचा प्रसाद' आणि द्वितीय व गौण तर खरीच परंतु अत्यावश्यक किंबहुना मूलाधार अशी आपली 'आभ्यंतरीक तयारी' अर्थात श्रद्धामय व सत्यपूर्ण, निरवशेष

व निरलस, कपटविहीन व स्वार्थनिरपेक्ष आत्मार्पण करण्याची उत्कट उत्कंठा व सदा कटिबद्धता हीं होय.

२ आपली श्रद्धा पूर्ण, निर्लेप व पुनीत असली पाहिजे. त्यांत आपल्या अहंमन्यतेची लेशमात्रहि दुर्गंधि असतां कामा नये. महत्वाकांक्षा, गर्विष्ठता, स्वयंमन्यता, आढ्यता, स्वैरता, स्वेच्छता, ऐहिक सुखोपभोगांची लालसा, व्यावहारिक जीवनचर्येची अपेक्षा, लौकिक मान्यतेची व प्रतिष्ठेची आशा, आध्यात्मिक सामर्थ्याची अभिलाषा आदि गोष्टींनी आपली श्रद्धा दूषित होण्याचा संभव असतो आणि हे दोष कधीं कधीं इतके सूक्ष्म असतात कीं, कितीहि शोध केला तरी ते सहसा दिसून येत नाहींत. त्यामुळें धुरांनीं आच्छादित अग्निज्वाला ज्या प्रमाणें धूर करते व स्पष्ट दिसत नाहीं इतकेंच नव्हें तर तिची उर्ध्वगामी गति सुद्धां कुंठीत झाल्यासारखी होते; त्याच प्रमाणें आपल्या श्रद्धेला जर उपरिनिर्दिष्ट एकाद्या विकृतीची दुर्गंधि येईल तर ती सुद्धां तशीच धुरकटेल व तिची परम तत्व आकलनाची ऊर्ध्वगति कुंठित होईल. म्हणून सुरवातीलाच मानवी जीवन हें ईश्वरी सूत्रसंचालित आहे, त्याची इतिकर्तव्यता ईश्वरी कार्यपूरकतेमध्येंच आहे व त्याची कर्मण्यता ईश्वरी नियमांच्या अभिव्यक्ततेमध्येंच आहे हें ध्यानांत धरून जीवन मार्ग आक्रमण्याचें धोरण निश्चित केलें पाहिजे. त्या संबंधांत अटल श्रद्धा व दृढभक्तीच पाहिजे. ऐश्वरीय नियंत्रणांतर्गत शुद्धि, शक्ति, दीप्ति, शांति व व्याप्ति यांच्याच प्राप्तीची सदैव उत्कट लालसा ठेवून आपलें मन व जीवन यांची उत्क्रांति व विकास त्याच्याच सूत्र–चालनानुसार झालें पाहिजे असा नित्याध्यास ठेविला पाहिजे, तेव्हांच आनंद प्राप्त होईल. दुसऱ्या कशाचीहि इच्छा धरूं नका. मागून मागावयाचेंच तर एकच गोष्ट मागा. वाणी, मन, बुद्धीला सुद्धां जें पर असें पारमात्मिक दिव्य सत्य त्याचा इहलोकीं

प्रत्यक्षानुभव केवळ आपल्या सर्व बंधुभगिनींच्या ठायीं व्यक्त व्हावा व त्यासाठीं योग्य ती परिस्थिति निर्माण होऊन सर्वांच्या मनोभूमिका त्या दिव्य सत्याच्या आविष्काराला अनुरूप व सुपात्र व्हाव्यात आणि या लोकीं त्यायोगें असत्याचा समूळ पाडाव होऊन त्याचा अगदा नायनाट व्हावा हीच गोष्ट मागून घ्या. त्यासाठीं अढळ, विशुद्ध व सुनिर्मल अशी श्रद्धा सतत वसत राहिली पाहिजे.

३ तुमची सत्यनिष्ठा आणि तुमचें आत्मार्पण सुद्धां तसेंच परिपूर्ण निखालस व निर्मळ पाहिजे. आत्मार्पण करावयाचें म्हणजे सर्वस्व सर्वतोपरी द्यावयाचें. त्यांत काडीमात्रहि कोठें आड पडदा ठेवावयाचा नाहीं. तें समर्पण स्वखुशीनें झालें पाहिजे. तें बिनशर्त असलें पाहिजे. त्यांत तिळभर सुद्धां कुचरपणा उपयोगी नाहीं. जें कांहीं तुमच्यांत आहे, जें कांहीं तुमचें आहे, जें कांहीं तुम्ही आहांत तें सारें त्या जगदंबेच्या चरणीं ओतलें पाहिजे; त्यांतून स्वतःकरितां, दुसऱ्या करितां किंवा अन्य देव देवतांकरितां लेशमात्रहि राखून ठेवितां कामा नये. त्या शिवाय तुमची सत्यनिष्ठा आणि तुमचे स्वार्पण परिपूर्ण व सुनिर्मल झालें असें ह्मणतांच येणार नाहीं. ह्मणूनच तें सर्वांग–शुद्ध व निर्मळ ठेवण्याची दक्षता घेतली पाहिजे.

४ ज्या मानानें तुमची श्रद्धा, तुमची सत्यनिष्ठा, तुमची समर्पणता परिपूर्ण व सुनिर्मल असेल त्या मानानें तुम्हांस ईश्वरी सान्निध्य व ईशप्रसाद लाधेल. अन्याधार सोडून जे केवळ माझ्याच आधारावर निर्भर राहतात, त्यांचा सर्व योगक्षेम वहाणें मला भाग पडतें, असें भगवद्वचन आहे. " अनन्याश्चिंतयंतो मां ये जनाः पर्युपासते। तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहं " हें सारें खरें. पण याचा अनुभव येण्यासाठीं तसलीच विशुद्ध व अनन्य भक्ति पाहिजे; तेव्हांच तो

प्रसाद तुम्हाला मिळणार. पण एकदां कां तो प्रसाद तुम्हीं चाखलांत, आणि एकदां कां तुम्हीं त्या जगन्मातेच्या सान्निध्यांत जाऊन पोंहोचलांत, कीं मग तुमचें कोण काय वाकडें करू शकणार आहे? कुणाची प्राज्ञा आहे कीं तुम्हास एका बोटानें धक्का लावील? मग तुम्हाला कोणाचें कसलेंहि भय काय ह्मणून राहील? त्या प्रसादाचा यत्किंचित् अंश लाभला, तर सर्व अडीअडचणींतून, सर्व धोक्यांतून, सर्व भीतींतून, सर्व कांटेरी आड मार्गांतून, सुरक्षित व सुखरूप निभावून घेतां येतें. मग तो प्रसाद पूर्ण मिळाल्यावर आणि तिचें सान्निध्य सतत प्राप्त झाल्यावर तुम्हाला कशाची भीति आहे? खुशाल वाटेल तेथें वाटेल तसा संचार करा; मनमुराद, मोकळेपणानें विहार करा. अडचणी रस्ता अडवितील, तर द्या लाथेनें झुगारून. मार्गांत धोक्याच्या अनेक सूचना मिळतील, ढुंकून सुद्धां तिकडे पाहूं नका. खुशाल डोळेझाक करा. कित्येक वेळां मुद्दाम तुम्हाला आड रस्त्याला नेण्यासाठीं सुंदर सुंदर रस्ते फुटलेले दिसतील, बागबगीचे फुललेले दिसतील, पण तिकडे बिलकूल लक्ष देऊं नका. त्या भुरळीला धुडकावून द्या. तुमची अटल श्रद्धा, अविचल सत्यनिष्ठा, व परिपूर्ण समर्पणता तुम्हाला तुमच्या नियत पंथानें सुखरूप, निश्चित ध्येयाप्रत घेऊन जाईल यांत शंका नको. ज्या अडचणी बिकट ह्मणून भासत होत्या, त्याच आतां सुवर्ण संधि होत जातील. जेथें धोका वाटत होता, तेथेंच सुरक्षितता व सुयशस्वितता असल्याचें आढळून येईल. आडमार्ग ह्मणून आडवे आले होते, तेच अगदीं जवळचे, सहज पार करण्यासारखे, सरळ व सोपे मार्ग असल्याचे अनुभवास येईल. तुमचें दौर्बल्यच तुमचें सामर्थ्य होऊन बसेल; आणि जें कांहीं कसें होईल अशी चिंता वाटत होती, तेंच असें सहज होईल अशी तुमची तुम्हालाच स्फूर्ति होईल; आणि त्या स्थितींत काय करावें, कसें करावें या मंत्राचा जप करण्याचा तुमच्यावर कधीं सुद्धां प्रसंग येणार नाहीं.

## बाबू अरविंद घोष

जगदंबेच्या प्रसादानें जें ईप्सित आहे, जें भावी आहे, तें आज नाहीं उद्यां निश्चयात्मक घडून येणार. तो परिणाम पूर्व निश्चत, सत्य प्रतीत, अनिवार्य व अप्रतिहततेनें प्रत्यक्ष आविर्भूत होणार, ही दृढ श्रद्धा ठेवा. सत्यनिष्ठेनें आत्मार्पण करा, ह्मणजे जगदंबा तुमची कधींहि उपेक्षा करणार नाहीं; तुम्हाला क्षणभर सुद्धां दूर लोटणार नाहीं; सदा प्रसन्न राहील; सदा सन्निध राहील हा पूर्ण विश्वास ठेवा आणि त्या विश्वासानें श्रद्धामय, सत्यपूर्ण समर्पण करा ह्मणजे झालें. त्यांतच जीवनसार्थकता आहे. त्यांतच जीवनसाफल्य आहे. त्यांतच पुरुषार्थ आहे इति शं.

## ४

या पृथ्वीतलावर ज्या अनेक शक्ति वावरत आहेत, त्यांपैकींच एकीचें व्यक्त स्वरुप ' संपत्ति ' हें होय. ऐहिक जीवनक्षेत्रांतील संपत्ति हें एक प्रधान अंग आहे. इहलोकींच्या जीवन–चर्येच्या संपूर्णतेसाठीं व तिच्या सफलतेसाठीं संपत्तीची आवश्यकता अपरिहार्य आहे. संपत्ति ही वस्तुतः व मूलतः एक ईश्वरीय शक्ति आहे. मानवी जीवन–सार्थकतेसाठींच तिचा या भूलोकीं अवतार झाला आहे. इतर स्वर्गीय शक्तीप्रमाणें तिचा देखील सदुपयोग केल्यानेंच जीवनसाफल्य सिद्ध होतें; अन्यथा मनुष्य आपल्या क्षुद्र, स्वार्थी वृत्तींत अनुसरून तिचा

दुरुपयोग करूं लागल्यास अन्य दिव्य शक्तीप्रमाणेंच ती संपत्ति सुद्धां त्याच्या विनाशास कारणीभूत होईल. अर्थात तिचें दैवी स्वरूप बदलून ती आसुरी अवतार धारण करील, मनुष्याच्या बोकांडीं बसेल; त्याच्या छातीवर नाचूं लागेल.

२ संपत्ति, सत्ता व संभोगवृत्ति या तीन ईश्वरदत्त दैवी संपदा होत. परंतु त्या जात्याच अशा स्वरूपाच्या आहेत कीं त्यांचा दुरुपयोग करण्याकडेच मानवी प्रवृत्ति सहज व शीघ्र वळते, आणि त्याच धोरणानें ती बळावते. या तीन शक्तीप्रीत्यर्थच सुरासुरांचा कलह माजला. दैत्यांचा देवाशीं विरोध आला. या तीन शक्ति साधारणतः अनाठायीं नांदतांना व दुष्कर्मार्थ उपयोजिलेल्याच आढळतात. या शक्ति ज्याच्या हातांत खेळतात, त्याच्या त्या सेविका व कार्यवाहिका होणें तर दूरच राहतें, पण उलट त्या त्याच्या स्वामिनी होऊन बसतात आणि त्याला वाटेल तशा नाचवितात.

३ संपत्तीच्या मागें जे लागतात व ज्यांना ती प्राप्त होते, ते संपत्तिमान, संपदायुक्त अथवा संपदाधिकारी होण्याचे ऐवजीं तेच त्या संपत्तीचे बंदे गुलाम, हांजीखोर नोकर व सांगकामे दास बनतात, आपल्या अभिजात दैवी अधिकारापासून भ्रष्ट होतात, मूळपदावरून च्युत होतात व आसुरी वृत्तीस बळी पडतात. संपत्तीच्या पाठीमागें लागणाऱ्या पैकीं किंवा तिला हस्तगत करून घेणाऱ्यांपैकीं या दुर्गतीच्या भोंवऱ्यांत गटंगळ्या खाणारेच शेंकडा नव्वदावर असतात! त्यांतून निभावणारे फारच थोडे. सामान्य जन बहुधा तिच्या मोहकतेला भुलून, तिच्या आसुरी मायेला वश होऊन आपलें मनुष्यत्व हिरावून बसतात आणि धनसंपन्न होण्याच्या ऐवजीं धनप्रमत्त होतात. यांतून निसटणारा शूर, वीर, संत, महात्मा एखादाच आणि तो पण विरळाच सांपडतो.

४ ह्मणून प्रत्येक आध्यात्मिक बलसाधक जीवानें संपत्तीच्या मोहांत फसूं नये तिला झुगारून द्यावें, तिच्या प्राप्तीचा हव्यास धरूं नये, तिचा सतत त्याग करावा, असा उपदेश प्रत्येक संत, महंत, शास्त्रकार, सिद्ध सारेच करीत आले आहेत. आत्मसंयमनाचें सामर्थ्य वाढवा, संपत्तीच्या दास्याची बेडी तोडा, तिच्यापासून दूर व अलिप्त रहा, तिच्या प्राप्तीची व साहचर्याची आशा तिळमात्र बाळगूं नका; वैयक्तिक वा कौटुंबिक सुखासाठीं किंवा परोपकारासाठीं, सामाजिक हितासाठीं सुद्धां तिच्या प्राप्तीचा व संग्रहाचा मोह धरूं नका, तिच्या लालित्याला भुलूं नका, तिच्या नटवेपणानें फसूं नका, तिच्या मधुर स्मितानें हुरळूं नका, तिनें देऊं केलेल्या ऐहिक विषयोपभोगाच्या व लौकिक ऐश्वर्याच्या जाळ्यांत गुरफटूं नका; नाहीं तर आध्यात्मिक सामर्थ्यसिद्धीचे सारे प्रयत्न फुकट जातील; वर्षानुवर्षें केलेली तपश्चर्या धुळीस मिळेल, जन्मजन्मांतरीचा पुण्यसंचय मातीमोल होईल; तुमची माणुसकी नष्ट होईल; तुमचें अभिजातत्व लयास जाईल. दैवी कोटींतून तुमचें उच्चाटन होईल. आसुरी कोटींत तुह्मी ढकलले जाल; आणि उच्चतम स्वर्गीय आनंदाच्या शिखरावर जाऊन बसण्याच्या ऐवजीं, तुम्हीं नीचतम उन्मादाच्या गर्तेंत रसातळाला जाऊन बसाल; यांत शंका नाहीं.

५ याच भीतीमुळें कित्येक शास्त्रकार व महंत तर याहि पुढें जाऊन विरक्ततेची कमाल मर्यादा गांठण्याचा उपदेश करतात. आणि अत्यंत साधें किंबहुना निवळ रुक्ष जीवन व्यतीत करा, निर्धनतेंतच आनंद माना, भिक्षावृत्तीवरच निर्वाह करा, अपरिग्रहतेची पराकाष्ठा करा, " करतल भिक्षा तरुतलवासः " या प्रवृत्तीचा स्वीकार करा, त्यांतच तुमचें हित आहे असें कंठरवानें सांगतात. परंतु ही एक घोडचूक होत असते. त्यायोगें चोराच्या हातीं जामदारखान्याच्या

किल्ल्या देण्यांतलीच गत होते. वास्तविक जी शक्ति दैवी आहे, तिला आसुरी बनूं देणें, हें आपल्या नामुष्कीचें लक्षणच नव्हे, तर परिणाम होय. उलट त्या शक्तीला स्वाधीन ठेवून तिच्या करवीं ईश्वरीसूत्रानुसार महत्कार्यें घडवून आणणें, हाच श्रेयार्थीचा खरा पुरुषार्थ होय. दैवी संपत्तीचे सभोंवार जें आसुरी मायेचें जाल पसरलेलें असतें, तें तोडून, झुगारून देण्यांत व त्या दैवी शक्तीचा दैवी उपयोग करून दैवी कार्य साधण्यांत श्रेय, साधकाचें खरें कर्तृत्व सामर्थ्य, कल्पनाचातुर्य व बुद्धिकौशल्य आहे. एखाद्या गोष्टीच्या दुरुपयोगांत भीति आहे ह्मणून त्या गोष्टीच्या सदुपयोगास देखील मुकणें व तिच्या वाऱ्यास सुद्धां न फटकणें, किंबहुना ती वाईट आहे, मोहक आहे, ह्मणून तिच्यापासून दूरदूर पळणें, याहून अधिक भ्याडपणाचें व कातरतेचें काम कोणतें असणार? साधक भ्याड व कातर असेल तर त्यानें कार्यसिद्धीची व इप्सित हेतुपूर्वीची आशा तरी काय ह्मणून धरावी ? तो अधिकार त्याला कसा येणार ?

६ वस्तुतः एखाद्या सामान्य संन्याशाप्रमाणें संपत्तीपासून दूरदूर पळून जाण्याचें कांहींच काम नाहीं, किंवा त्यामुळें जीं कांहीं ऐश्वर्योपभोग साधनें सहज उपलब्ध होतात, जे सुखविलास अनायासें प्राप्त होतात, त्यांच्या ठायीं राजसी आसक्ति पण ठेवण्याचें प्रयोजन नाहीं. तसेंच त्या सुखैश्वर्योपभोगांत दंग राहून, त्या विषयविलासांत मग्न होऊन, आपल्या क्षुद्र मनोवृत्तींचा आपल्यावर पगडा बसूं देऊन, आपल्या तामसिक मनोवृत्तींच्या आहारीं पण आपण जातां कामा नये. उलट आपली सात्विक वृत्ति सदा जागृत ठेवून, तिच्या द्वारें या राजसिक व तामसिक वृत्तींचा पाडाव करून, त्या धनसंपन्नतेचा योग्य उपयोग करण्यास शिकणें, हेंच साधकाचें एक साध्य होय. ही संपन्नता सुद्धां त्या जगन्मातेच्या नानाविध प्रसादांपैकींच एक प्रसाद समजून तिचें

आदरभावानें ग्रहण करावें, व त्या जगदंबेच्या कार्यासाठींच तिचा अविश्रांत विनियोग करावा, यांतच साधकाचें श्रेय आहे.

७ विश्वांतर्गत सर्व संपत्ति जगन्मातेची आहे. ज्या कोणाचे हातीं या भूतलावर ती कोणत्याहि स्वरूपानें येते, तो त्या वेळेपुरता तिचा एक विश्वस्त प्रतिनिधी होतो. तो त्या संपत्तीचा स्वामी होत नाही. ह्मणून विश्वस्ताच्या नात्यानें त्यानें तिचा सदुपयोग करीत रहावें व जगदंबेची इच्छा होतांच तिला दुसऱ्याचे स्वाधीन करण्यास सदा तयार व तत्पर रहावें. लक्ष्मी चंचल आहे. आज एका जवळ तर उद्यां दुसऱ्या जवळ अशी ती सारखी नाचत असते. हा अनादि कालाचा चालत आलेला अनुभव आहे. त्याचा सुद्धां भावार्थ हाच कीं संपत्ति जगदंबेचा प्रसाद होय. तो आज याला, उद्यां त्याला प्राप्त होत असतो. पण मनुष्य मात्र मध्येंच स्वार्थलंपट होऊन आपण विश्वस्त प्रतिनिधि आहोंत, हें विसरतो व त्यावर स्वतःचा मालकी हक्क गाजवूं पहातो, आणि अखेरीस तोंडघशीं पडतो. ह्मणून संपदा हातीं आल्यावर तिचा आपण विनियोग कसा करतो, तिच्या संबंधांत आपली वृत्ति कशी राहाते, आपली अभिलाषबुद्धि कशी वहावते, आपण एक विश्वस्त प्रतिनिधि ह्मणून तिचा उपयोग करण्याकडे आपली प्रवृत्ति बळावते, किंवा तिचा स्वामी ह्मणून तिचा उपभोग घेण्याकडे आपलें मन धाव घेतें, याचा साधकानें फारच बारकाईनें शोध घेतला पाहिजे व सदा दक्ष राहून जी संपदा वास्तविक श्रेयस्कर व्हावयाची तीच आपली घात करणारी न होईल या विषयीं सावधानता ठेविली पाहिजे.

८ जेव्हां जेव्हां अशा संपत्तीचा विनियोग स्वतःच्या एकाद्या व्यक्तिगत कार्याप्रीत्यर्थ करण्याचा प्रसंग येईल, तेव्हां तेव्हां जें जें कांहीं त्यामुळें आपणांस उपभोगावयास मिळतें, तें सारें अंबेचा प्रसाद

होय व त्याचाच आपण उपभोग घेत आहोंत, याची केव्हांही विस्मृति होऊं देऊं नये. कोणत्याहि विशिष्ट सुखाची लालसा ठेवून, त्या प्रीत्यर्थ त्या धनाचा अपव्यय करूं नका. जें कांहीं त्या संपन्नतेमुळें यदृच्छया व अनायासें भोगास येईल, तें ईश्वरदत्त प्रसाद म्हणून आदरभावानें स्वीकारा; उपयोगावर लक्ष ठेवा. उपभोगाकडे मन जाऊं देऊं नका. अत्यंत निस्वार्थी होण्याचा प्रयत्न करा. एकाद्या कंजूष मारवाड्या सारखा पै पैचा हिशेब डोळयांत तेल घालून ठेवीत जा. प्रत्येक बाबतींत चौकसपणा व दक्षता ठेवा. सारांश, उत्तम विश्वस्त होण्याचें ध्येय डोळयासमोर ठेवून संपत्तीचा विनियोग करा. ध्यानांत ठेवा, संपदा तुमची नव्हती, तुमची नव्हे, तुमची नसणार. तुम्हीं फक्त तिच्या उपयोगासाठीं जगदंबेचे एक वहिवाटदार गुमास्ते आहांत. जे जे कांहीं त्या योगें प्राप्त होईल तें सारें जगन्मातेच्या चरणीं निवेदन करा, समर्पण करा, व तिच्या आदेशाप्रमाणें त्यांतून व्यय करीत रहा. स्वतः करितां किंवा दुसऱ्या कोणाकरितां स्वेच्छेनें त्यांतील फुटक्या कपर्दिकाची सुद्धां अपेक्षा ठेवूं नका. मग खर्च करण्याची गोष्ट तर दूरच राहिली. नुसती अपेक्षा, निवळ अभिलाषबुद्धीच तुमचा सर्वनाश करावयाला पुरेशी आहे. मग प्रत्यक्ष उपभोग तुम्हाला रौरव नरकाप्रत नेईल, यांत शंकाच कशाला पाहिजे.

९ कोणी संपत्तिसंपन्न आहे तर कोणी सत्ताविभूषित आहे, तर कोणी ऐश्वर्योपभोगी आहे, ह्मणूनच केवळ तो विभूतिमान आहे, असें समजून त्याच्याशीं लांगूलचालन करूं नका, त्याच्या ऐश्वर्यानें दिपूं नका. त्याच्या सत्तेनें भयशंकित व कर्तव्यमूढ होऊं नका. त्याच्या संपन्नतेनें मिंधे होऊन त्याच्या कच्छपी लागूं नका. तोंडपुंजेपणानें त्याची हांजी हांजी करूं नका. त्याची व्यर्थ स्तुतिस्तोत्रें गाऊं नका. " स्तुती करावी परमेश्वराची । करूं नये व्यर्थ कधीं नराची । स्तुतीस

कीं ईश्वर पात्र होतो । तसा तिला मानव काय होतो" हा बालपणाचा पाठ विसरूं नका. जगदंबा तुमच्यापैकीं प्रत्येकाजवळ स्वदत्त शक्तींचा पैन पैचा हिशेब मागेल. त्यावेळीं ज्या मानानें तुमचा हिशेब योग्य व चोख असेल त्या मानानेंच तिच्या प्रसादाची तुम्हाला प्राप्ति होईल हें ध्यानांत ठेवा. जें कांहीं स्वायत्त आहे, जें कांहीं सहजासहजीं ईश्वरदत्त तुमच्या हातीं सुदैवानें आलें आहे, त्यांतच समाधान मानून त्याचा सदासर्वदा सद्विनियोग करा, व सारा हिशेब मातेच्या चरणीं रुजू करा; त्यांतच तुमचें इहपरत्र कल्याण आहे; तेंच तुमचें इष्टापूर्त होय. साधकाची अभ्युदय निःश्रेयस प्राप्ति त्यांतच आहे. करितां व्यर्थ भ्रमांत पडूं नका.

१० संपत्तीच्या तुम्ही जर आहारीं गेला नाहींत, भ्याडासारखे वृथा संन्याशाचें सोंग आणून तिच्या पासून दूरदूर पळाला नाहींत, तर त्या च संपत्तीचा इहलोकीं ईश्वरीकार्यप्रीत्यर्थ तुम्हाला अधिक शक्तिमत्तेनें, अधिक बुद्धिकौशल्यानें व अधिक प्रयोजनचातुर्यानें सदुपयोग करतां येईल " यौवनं धनसंपत्तिः प्रभुत्वमविवेकता " ही अनर्थ चतुःसूत्री आहे. अशा परिस्थितींत धनसंपदा अनायासें प्राप्त झाली असतां, मनाचा समतोलपणा बिघडूं न देतां, संपत्तिजन्य सुख-विलासोपभागी साधनांची हांव न धरतां, संपत्ति कमविण्याचें आपलें सारें सामर्थ्य जी जी संपदा हस्तगत होईल, ती सर्व संपदा जे जे सुखोपाय उपलब्ध होतील ते ते एकूण एक उपाय निरलसपणें, निष्कपटपणें, निरभिमानपणें व निःस्वार्थपणें मातेच्या चरणीं निवेदन करून, तिच्या आदेशानुरूप त्या सामर्थ्याचा, त्या संपदेचा व त्या उपायांचा उपयोग करण्यांतच आपली ऐश्वर्यप्रद मुक्ति आहे. संपत्ति प्राप्त होतांच यत्किं-चित् जरी मनाची चंचलस्थिति झाली, तिच्या उपभोगाचा काडीमात्र विचार उद्भवला, तिच्या सुरक्षिततेची लेशमात्र चिंता वाटली, तिच्या

संग्रहाची तिळमात्र लालसा उत्पन्न झाली, तिच्या उपयोगाची रतिमात्र योजना स्वार्थपरतेनें प्रादुर्भूत झाली, तर आपल्या डोळ्यावरील संपत्ति-मदाचें पटल दूर झालेलें नाहीं, ऐश्वर्याच्या मोहांतून आपण निसटलेलें नाहीं, धनाशेच्या बंदीपाशांतून आपण विमुक्त झालों नाहीं, हें निश्चित समजावें. श्रेयार्थी मुमुक्षजनानें या संबधांत फार च बारकाईनें आत्म-निरक्षण युक्त तपासणी केली पाहिजे.

११ स्वेच्छेनेंच साधें जीवन जो व्यतीत करतो, अति निर्धन स्थितींत सुद्धां संपत्तीची उणीव ज्यास किंचित्‌सुद्धां भासत नाहीं, जें जें कर्म उपस्थित होईल, तें तें सुहास्यतेनें सिद्ध करतों व आपलें ध्येय गांठण्याच्या मार्गांत धनाभावामुळें कोणतेंहि प्रकारें व्यत्यय येऊं देत नाहीं, किंवा त्यामुळें त्यांत दिरंगाई अगर कुचराई होऊं देत नाहीं, तोच खरा पुरुषार्थसंपन्न श्रेयार्थी होय. तद्वत च ईश्वरी नेमानेमानुसार धनसंपन्नतेमध्यें व सुखैश्वर्यांत रहाण्याचा जरी त्यास प्रसंग आला, तरी सुद्धां त्यांत देखील तो आपली साधी जीवनचर्या तशीच चालू ठेवितो, धनप्राप्तीची व लक्ष्मीच्या साहचर्यतेची जाणीव बाळगीत नाहीं, समोर आलेलें कर्तव्यकर्म निर्वेधपणें, निरभिमानतेनें पार पाडतो व जगन्मातेचा हा आपणांवर मोठाच अनुग्रह आहे या भावनेनें तिच्या प्रसादांतच सदा आनंदी व प्रसन्नचित्त असतो.

१२ अशा सदानंदी, प्रसन्नचित्त समवृत्ति पुरुषाच्या हातीं धनागम ही एक दैवी शक्ति होय. ती त्याच्या हातांत सुलभतेनें व सहज लीलेनें खेळत असते व तिच्या द्वारा त्याच्या करवीं जगदंबा आपलें सुमहत्कार्य सिद्धीस नेते. पृथ्वीतलावरील समाज व्यवस्थेंत सौंदर्य, सौकर्य, स्थैर्य व साम्य प्रस्थापित करण्याचें कार्य जगन्माता त्या द्वारेंच घडवून आणते व एकंदर मानवी जीवनाचा दृष्टिकोन च

बदलून टाकते. ज्याचा हव्यास वाटत होता, तेंच त्याज्य वाटूं लागतें. जें त्याज्य व उपेक्षणीय भासत होतें, तेंच आदरणीय होतें व प्राप्तव्य होऊन बसतें.

१३ पण हें सर्व धनागम झाल्यावर च व्हावयाचें, हें केव्हां हि विसरून चालावयाचें नाहीं. ह्मणून धनप्राप्तीच्या आपल्या बुद्धि-क्षमतेचा जर कोणी उपयोग करणार नाहीं, आपल्या धनसंपादन-सामर्थ्याला जर कोणी कामास लावणार नाहीं, पुराणांतरीं वर्णिलेल्या, वाखाणलेल्या व उपदेशिलेल्या परिस्थित्यनुरूप धनागमाची भीति वाटून, त्यापासून जर कोणी दूरदूर पळेल, तर तो केवळ भ्याड व कातर ठरेल; इतकेच नव्हें, तर मातेच्या सेवेंत चुकार ठरेल व तिच्या राजवटींत अपराधी व दंडार्ह समजला जाईल, हें लक्ष्यांत ठेवा. सारांश, आपल्या बुद्धि वैभवानुरूप, आपल्या कर्तृत्वसामर्थ्यानुसार धनसंपादन करण्याचा समुचित उद्योग करणें हें आपलें एक पवित्र कर्तव्य आहे, हें विसरतां कामा नये. धनाचा मोह अनावर होतो. धनाचा मद उन्मादकारक होतो. धनाचीं प्राप्ति चांचल्य आणते. ह्मणून धन-प्राप्तिसाठीं ईश्वरप्राप्त बुद्धि व शक्ति यांचा उपयोग च करण्याचें सोडून देणें हा विचार कुच कामाचा व निंद्य च नव्हे तर पापमय होय.

१४ आपल्या बुद्धिचातुर्यानें व कार्यकुशलतेनें धनसंपादन करणाऱ्यांपैकीं जे कोणी निःस्वार्थी, समर्थ, सदा जागृत, पूर्ण विवेकी, कर्तव्यदक्ष, नित्य ईश्वरप्रणत असतील, त्यांच्याच हातीं धनसंपदा मातृकार्यप्रवण होते, म्हणून तुह्मी आपली मनोवृत्ति स्वार्थ–निरपेक्ष, कार्यक्षम, समतोल, विवेकशील, दक्ष ठेवा ह्मणजे माता तुमच्यावर प्रसन्न होईल, तुमचें इहलोकीं कल्याण होऊन तुमचे निःश्रेयसहि साध्य होईल. इतिशं ।

५

ईश्वरीय कार्याचे खरे कार्यवाहक जर तुम्हास व्हावयाचें असेल, तर तुमचें पहिलें ध्येय स्वार्थपर वासना व अहंभाव यांपासून सर्व-तोपरी मुक्त होणें हें असलें पाहिजे. ही मुक्तता त्या वासनांना जबर-दस्तीनें दाबून टाकण्यानें मिळणारी नव्हे. ती त्यांचे वर विजय संपादून मिळत असते. अर्थात् आपल्या वासना व अहंभाव यांना आपल्या आधीन ठेवून त्या उभयतांस ईश्वरीकार्याप्रीत्यर्थ कार्यक्षम व सेवा-परायण बनविणें हेंच प्रत्येक श्रेयार्थीचें प्रथम ध्येय होय.

२ तुमचें सर्व जीवन एक समन्वित, संपूर्ण, त्यागमय समर्पण

झालें पाहिजे. तुमची प्रत्येक कृति सेवाभावानें दैवीशक्तीचें दैवी कार्यांत संक्रमण करण्यासाठीं च होत राहिली पाहिजे. जें जें कार्य तुमच्या हातून घडेल, त्या प्रत्येकांत दैवी शक्तीचें अधिष्ठान व तिचें अवतरण प्रत्यक्ष होत गेलें पाहिजे. तुमच्या अभिजाततेमुळें दैवी-संपत्तीचा जो कांहीं अंश तुम्हांस लाभला असेल, त्याच्या बलावर तुम्ही आपल्या स्वतःला दैवी वातावरणांत इतकें विलीन करून टाकलें पाहिजे कीं तुमची ब्रह्ममयता एक सहजस्थिति होऊन जावी. मातेची इच्छा तीच तुमची इच्छा, तिची प्रेरणा तीच तुमची कार्यप्रवृत्ति, तिची इच्छा–पूर्ति हीच तुमची कार्यसिद्धी, तिचें कार्यसंपादन हेंच तुमचें पुण्यकर्म, थोडक्यांत, तुम्ही तिचे निवळ कारभारी, म्हणियागत, भारवाही हमाल, धन्याचे सेवक या भावनेनेंच तुमचें अंतर्बाह्य, सारें जीवन ओतप्रोत भरून गेलें पाहिजे.

३ जोंपर्यंत ही संपूर्ण समान्वितता आपल्या अंगांत भिनून जात नाहीं, जोंपर्यंत हें निःशेष समर्पण आपल्या ठायीं पुरें पुरें बाणत नाहीं; जोंपर्यंत निष्कपट त्यागवृत्ति ही आपली सहजस्थिति होऊन बसली नाहीं, तोंपर्यंत प्रत्येक श्रेयार्थीनें आपण देहधारी एक जीव आहोंत व आपलें जीवनकार्य ईश्वरसेवा करणें व ईश्वरप्रीत्यर्थ पुण्यकर्म करणें हें होय हें ध्यनांत वागवून आपला जीवनक्रम चालविला पाहिजे. कधीं कधीं आपली अहंवृत्ति बळावेल व जीं कांहीं कार्यनिष्पत्ति झाली आहे ती आपल्या कर्तबगारीचें व आपल्या कर्तृत्वशक्तीचेंच पर्यवसान होय असें आपल्याला भासवील. अशा प्रसंगीं आपण एक भिन्न जीवात्मा आहोंत, आपल्याला इच्छा–स्वातंत्र्य आहे, आपल्याला विचार–सामर्थ्य आहे; त्याच्या जोरावर आपण आपली जीवननौका स्वयंस्फूर्तीनें हांकारूं शकतो; ही जाणीव असली तरी सुद्धां प्रत्येक कार्य ईशार्पण करण्याची बुद्धि जर जागृत ठेविली, तर आज नाहीं

## बाबू अरविंद घोष

उद्यां आपल्या हृदयस्थ ईश्वराच्या प्रेरणेनें आपली गुप्त अंतःस्थ दैवी शक्ति, आपली ईश्वरतन्मयता समर्थ होत्साती आपल्या अहंवृत्तीला वश करील व त्या अहंवृत्तीच्या द्वारेंच आपलें सारें जीवनसर्वस्व ईश्वरीय कार्याला वाहण्यास आपणास भाग पाडील. परंतु त्यासाठीं तुमचा मात्र सतत प्रयत्न होत असला पाहिजे. जी जी स्वार्थपर वासना उद्भवेल, जी जी वैयक्तिक परिग्रहाची अभिलाषा वळावेल; जी जी अहंमन्यतेची वृत्ति उठेल, जी जी विकारवश भावना घर करूं पाहील, तिचें तिचें समयासमयीं योग्य नियंत्रण करीत राहून, ईश्वरप्रीत्यर्थ व ईश्वरप्राप्त्यर्थंच हा जीवनक्रम व्यतीत करावयाचा आहे हें ध्येय सदा-सर्वदा दृष्टिसमोर ठेवून पुण्यकर्मांकडेच आपल्या प्रवृत्तीला सारखें वळवीत राहिलें पाहिजे. या प्रयत्न–सातत्यांतच, या नित्योद्योगशीलतें-तच श्रेयार्थीची श्रेयःसिद्धि आहे. तसेंच किंबहुना त्याबरोबरच आपल्या कर्मांच्या फलाची किंवा आपल्या प्रयत्नांच्या पूर्णतेची अथवा आपल्या उद्योगाच्या यशस्वितेची अथवा आपल्या सेवाकार्याच्या पारितोषकाची किंवा आपल्या परिश्रमाच्या मोबदल्याची केव्हांहि काडीची सुद्धां अपेक्षा करतां कामा नये. ईश्वरीय कार्य संपादन हेंच आपलें बक्षिस. ईश्वरी कार्य–पूर्ति हेंच आपलें समाधान. ईश्वरी कार्यांत सहायक होणें हाच आपला आनंद, अशीच मनोवृत्ति सदा अंगीं बाणली पाहिजे.

४ जो कोणी ईश्वरप्रेमी, सत्यान्वेषी, श्रेयार्थी असेल त्याला तर निरपेक्षतेनें केलेली सेवा ईशचरणीं रुजूं होणें हेंच खरें व बहुमूल्य पारितोषक वाटेल. त्या सेवेमुळें होणारी आपली आध्यात्मिक प्रगति व उन्नति हीच त्याची खरी शांति होय. उत्तरोत्तर परमात्म्याशीं आपलें सांनिध्य होत आहे, या जाणीवेंतच त्याचा सारा आनंद. ईश्वराप्रीत्यर्थ व ईश्वर प्राप्त्यर्थ आपल्या हातून कांहीं तरी पुण्यकार्य, थोडा फार परोपकार, अल्पस्वल्प जन सेवा घडत आहे या समा-

धानांतच त्याचें सारें ऐश्वर्य; अर्थात् त्यांतच त्याचें ईश्वर–सामीप्य व ईश्वर–सालोक्य सामावलेलें आहे.

५ अशा समाधानी व आनंदी वृत्तींत काळ कंठीत असतांनाच ईशदयेनें एक असा दिवस उगवेल कीं त्या दिवशीं त्याचें त्यालाच वाटूं लागेल कीं आपण केवळ ईश्वरी सूत्र चालना प्रमाणें नाचत आहों, आपली व्यक्तिगत कर्तबगारी, कर्तृत्वशक्ति, बुद्धि–कौशल्य व इच्छा–स्वातंत्र्य हा सारा भ्रम होता. आपल्या हातून जें जें कांहीं घडलें, घडत आहे व पुढें मागें घडणार असेल त्याचे कर्णधार आपण नसून आपल्या जीवन नौकेचें सुकाणूं हातीं धरून तिला योग्य दिशेनें चालविणारा कुशल नावाडी दुसराच कोणी तरी आहे; इतके दिवस आपण आपल्या अहंमन्यतेच्या आळ्यतेंत गुरफटून गेल्यानें गाडी बरोबर गाडीच्या खालीं चालणारा कुत्रा जसा गाडीचा भार मीच घेऊन चाललों आहे असें समजत असतो व त्याच प्रौढींत डौलानें मिरवत चालत असतो तद्वतच आपण सुद्धां हें सारें कर्तृत्वाचें ओझें आपल्या शिरावर आहे व आपणच आपल्या बुद्धि सामर्थ्यानें व आपल्या कार्य चातुर्यानें हा सर्व गाडा वाहून नेत आहोंत अशा पोकळ भ्रमांत फसून व्यर्थ तोरा मिरवित होतो. ही जाणीव झाली कीं मग ईश्वर–प्रसादाच्या प्राप्तीला फारसा विलंब लागत नाहीं. प्रथम आपल्या सेवा भावानेंच जगन्माता संतुष्ट होत्साती दिवसेंदिवस आपल्याला अधिकाधिक जवळ घेते व आपले लाड करूं लागते. 'भाव तोची जाणा देव' आणि 'देव भावाचा भुकेला' इत्यादि संत वचनांचा गूढार्थ तरी हाच होय. अशा प्रकारें भावबळानें मातेच्या लाडिकपणास पात्र झालो कीं तिच्या प्रेमाच्या प्रवाहांत वहात राहून आपण आपलें सर्वस्व तिच्या हवाली करतो; करणें सवरणें सारें कांहीं तिच्या हातीं सोपवितों. अर्थात् जेव्हां कोणतेंहि कर्म दत्त ह्मणून उभें राहील

तेव्हां आपण तत्काल एकाग्र चित्तानें तिच्या चरणीं तें निवेदन करतों आणि तिच्या आदेशानुरूपच त्या कार्यास प्रवृत्त होतो; मग जें व्हावयाचें तें सर्व 'कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम' अशा सामर्थ्य प्रभावानेंच निश्चित रूपांत घडून येणार. त्या संबंधांत आपणांस व्यर्थ चिंता करीत बसण्याचें कांहींच प्रयोजन नाहीं. तसेंच त्याचा अमुकच एक परिणाम झाला पाहिजे, त्याची अमक्याच प्रकारें फलश्रुति झाली पाहिजे, अशी अपेक्षा करण्याचें किंवा अशी कांहीं आशा धरण्याचें सुद्धां कांहींच कारण नाहीं. अशा प्रकारें भावपूर्णतेनें आपली चित्तवृत्ति तन्मय झाली ह्मणजे मग आपल्या अनुभवास येऊं लागतें कीं आपल्या समोर आपल्याला करण्यासाठीं कोणतेंच कार्य उभें रहात नाहीं. जें कांहीं जगन्मातेला करावयाचें असेल, जें कांहीं तिला घडवून आणावयाचें असेल त्याची सारी रूपरेखा नीट आखून तें कसें करावें, केव्हां करावें, वगैरे सर्व खुलासेवार माहितीसह ती आपल्याकडे एक आज्ञापत्रक पाठविते आणि त्या आज्ञापत्रकाबरहुकूम वागण्याचें तेवढेंच काय तें आपलें कार्य ह्मणा, कर्तव्य ह्मणा कीं कर्म ह्मणा, जें नांव द्याल तेवढेंच बाकी उरतें. त्या बद्दलचे गुणदोष, पापपुण्य, स्तुतिनिंदा यांची जबाबदारी आपणावर मुळींच राहत नाहीं. "मज कां लागला करणें विचार। ज्याचा कारभार त्याचे माथां ॥" अशी आपली सहज मनोवृत्ति होऊन बसते. जगदंबे कडूनच स्फूर्ति मिळणार; तिच्या कडूनच चालना मिळणार; तीच सर्व धोरण ठरविणार; तिच्याच इच्छेप्रमाणें कार्यें घडून येणार असें आपल्या स्पष्ट प्रत्ययास येऊं लागतें. आपली प्रत्येक कृति, प्रत्येक हालचाल तिच्या सूत्रचालनानुसार होते. आपलें सर्व सामर्थ्य, आपलें तन, मन, धन, ऐश्वर्य, वैभव सर्व कांहीं तिचें आहे; तिच्या करतां आहे; तिनें दिलेलें आहे. तें आपलें नाहीं. आपल्या साठीं पण नाहीं व ती आपली स्वतंत्र कमाई पण नाहीं.

" न मम " ही भावना दृढ होत जाते आणि या मृत्युलोकीं आपण तिच्या लीलेचें एक कळसूत्री बाहुलें, तिच्या कार्याचे एक संपादक, तिच्या हेतुपूर्तीचें एक साधन आहोंत अशीच आपली वृत्ति झाल्यानें त्यांतच आपल्याला इतिकर्तव्यता दिसते, सार्थकता वाटते, समाधान होतें, आनंद मिळतो व शांति प्राप्त होते.

६ अशा प्रकारच्या तन्मयते पलीकडे, अशा प्रकारच्या ईश्वराधीनतेपेक्षां, अशा प्रकारें मातेच्या मांडीवर लोळत राहाण्यापेक्षां आणखी कांहीं विशेष सौख्यमय, आनंदपूर्ण, प्रशांत व प्रसन्न अशी स्थिति असेल अशी कल्पना सुद्धां करवत नाहीं. कारण अशा अवस्थेमध्येंच आपण अंधःकारपूर्ण, तमोमय, अज्ञानग्रस्त दशेंतून निघून प्रकाशपूर्ण, तेजोमय, ज्ञानसंपन्न अशा ब्राह्मी स्थितीला पोंचतों आणि आनंद, शांति व शक्ति यांचा अविरत, अखंडित व सतत उपभोग घेतों.

७ परंतु या प्रमाणें आपल्या अंतरिक वातावरणांत क्रांति घडून येत असते, त्या वेळीं आपण मात्र सदा जागृत व चिर सावधान असलें पाहिजे. नाहीतर आपली स्वाभाविक अहंता आपला केव्हां गळा पकडील आणि आपल्याला पेंचांत टाकील याचा नेम नाहीं. तिच्या सारखी धूर्त, स्वहेतु साधन–कुशल व मोहनी घालून फसविणारी दुसरी कोणतीच वृत्ति आढळणार नाहीं. म्हणून केव्हांहि, कोठें हि, कसल्या हि स्वार्थ-परतेला थारा देऊं नका. आपल्या पवित्र भावाची शुद्धता व निष्कपट आत्मार्पणाची पूर्णता यांत कोणत्याहि व्यक्तिगत मनोवृत्तीनें गढूळता किंवा न्यूनता येऊं देऊं नका. कोणत्या हि कार्याची आसक्ति ठेवूं नका. कर्मफलाची अपेक्षा बाळगूं नका. आपण कोणीतरी एक विशिष्ट ईश्वरी शक्ती प्रेरित कार्यवाहक आहों, अशा अभिमानाचें वारें अंगांत शिरूं देऊं नका. आपल्या प्रत्येक कार्याला ईश्वरी स्फूर्तीच मूलाधार आहे,

अशा आढ्यतेनें फुगूं नका. आपली प्रत्येक कृति ईश्वरी आदेशा-नुसारच घडत आहे, त्यांत कोठेंहि चूक होणें शक्यच नाहीं, अशा गर्वानें फुलूं नका; अहंमन्यतेनें भुलूं नका; सिद्धीच्या मदानें धुंद होऊं नका. यशोविजयाच्या डौलानें मिरवूं नका. सारांश, जें जें कांहीं तुमच्या हातून घडेल त्यांत यत्किंचित् सुद्धां स्वार्थाची किंवा परार्थाची दुर्गंधि येऊं देऊं नका. ज्या दैवी शक्तीच्या संचारामुळें तुमच्या हातून महत्कार्ये घडून येत आहेत त्या दैवी शक्तीचा ताठा तुमच्या अंगांत शिरूं देऊं नका. आणि तिचा अपव्यय किंवा दुरुपयोग करण्याची लवमात्र किंवा पळभर हि वृत्ति–तरंग तुमच्या मनोभूमिकेंत उठूं देऊं नका. तुमची श्रद्धा अटल असूं द्या. तुमची भावबुद्धि निर्दोष राहूं द्या. तुमची सत्वसंशुद्धि निष्पाप असूं द्या. तुमची कार्यप्रवृत्ति सत्यपर व निरपेक्ष राहूं द्या. प्रत्येकक्षणीं, प्रत्येक कृतींत तुमची तन्मयता व तुमची ईश–परायणता संपूर्ण, समन्वित, निरलस निष्कपट व सर्व व्याप्त असूं द्या. म्हणजे तुमच्या अहंवृत्तीच्या लहरी आपोआप जागच्याजागींच जिरत जातील. तिचा तो मधुर मोहनी मंत्र तुमच्यावर चालणार नाहीं तिचा जादू टोणा फुकट जाईल. तुमच्यावर त्याचा रेसभर सुद्धां परिणाम होणार नाहीं. उलट तीच तुमची दासी म्हणून सर्व रिद्धी सिद्धीसह तुमच्या सेवेंत सदा हात जोडून तत्पर राहील.

८ तुमच्या श्रेयःसाधनाची अंतिम पायरी तर तेव्हांच येईल जेव्हां तुम्हाला आपलें असें कांहीं पृथक् अस्तित्व आहे, याची जाणीवच नव्हे तर रतिमात्र आभास सुद्धां उरणार नाहीं. जीव शिवाचें सख्य होईल, ऐक्य होईल; परमात्म्याशीं तुमच्या जीवात्म्याचें तादात्म्य होईल. आपण एक ईश्वराचे भक्त आहोंत, त्याचे दास आहोंत, सेवेकरी आहोंत, आज्ञाकारी आहोंत हा पृथक्पणाचा भास उरणार नाहीं; तर आपणच सर्व विश्व आहोंत, आपल्याच ठिकाणीं

हें सर्व वसत आहे व नांदत आहे अशा प्रकारची सहजोन्मनी स्थिति होऊन तुम्हीं या भूतलावर बालवृत्तिवत् आचरूं लागाल, जगदंबेचे एक लडिवाळ लेकरूं, तिच्याच मांडीवर लोळणारे, तिच्याच पदराला धरून चालणारे, तिच्याच प्रांगणांत रांगणारे व तिच्याच कौतुकासाठीं क्रीडा करणारे असें तुम्हीं व्हाल, तेव्हांच तुम्ही शेवटची पायरी गांठलीत व सामीप्य व सालोक्य यांची सीमा ओलांडून सारूप्य व सायुज्य यांच्या प्रदेशांत पाऊल ठेवण्यास लायक व्हाल. मग तेथें मात्र तुम्ही मातेच्या ठायीं व माता तुमच्या ठायीं वास करणारीं व्हाल. तुमची कृति फार तर काय पण तुमचा श्वासोच्छ्वास, तुमच्या पापण्यांची उघडझांप सुद्धां मातेच्याच ठायीं होत आहे, तिच्यामुळेंच होत आहे; तुमचा प्रत्येक विचार, तुमचा प्रत्येक उच्चार, तुमचा प्रत्येक आचार, केवळ मातेचाच विचार, उच्चार व आचार होय, यांची तुमची तुम्हास पूर्ण जाणीव होईल. इतकेंच नव्हें तर तशी अनुभूति पण येत राहील.

९ तिच्या शरीरापासून तुमचें शरीर बनलें आहे, तिच्या शक्तीचा प्रादुर्भाव तुमच्यांत झाला आहे, तिच्या हाडामांसाचेंच तुम्हीं आहां, तिच्या प्रमाणेंच तुमची हालचाल होत आहे, याचा तुम्हाला अनुभव येईल. तुमच्या रोमरोमांत याची साक्ष पटेल. पदोपदीं तुम्हास त्याची कार्यखूण पटत जाईल. तुम्हीं निर्भय व्हाल व निर्भीकतेनें नांदून या लोकीचे आपलें नव्हें तर मातेचें कार्य उरकाल, त्यांतच आनंदी आनंद मानाल. सत्, चित् व आनंद सदा आपल्या पाशींच आहे. आपल्याहून भिन्न अशी कांहीं प्राप्य व साध्य वस्तु व स्थिति नव्हे याची तुम्हाला ओळख होईल. “आहे आपुल्या तें अंगीं, गवसेना जगीं दुजें ठायीं” याची सत्यता प्रत्ययास येईल. अशी स्थिती प्राप्त होऊन ती तुमची सहज सदाची झाली म्हणजे मग तुम्ही सारूप्य व सायुज्य

या अवस्थांचे भोक्ते व्हाल. मग तुमच्या हातून जीं जीं कर्मे घडतील तीं तीं सारी सदा पुण्यच कर्मे होतील. तुमचें ज्ञान परिपूर्ण, विशुद्ध व अवसानग्राही होईल. तुमची इच्छा अनिवार्य, कार्यक्षम व सदा सर्वभूत-हितरतच राहील. तुमची कृति सर्वभूत-सुखकारी, पुण्यमय, कल्याणप्रद, परोपकारी व निःश्रेयस साधकच होईल. सारांश तुमची वृत्ति, तुमचें ज्ञान, तुमची इच्छा, तुमची कृति सदैव परिणाम-साधक, अचूक, सहज-प्रभावित, निर्दोष, निरपेक्ष, स्वाभाविक, ईश्वरीय, संपूर्ण, यथासांग, समन्वित व सत्यान्वेषीच होत जाईल, यांत शंकाच नको. अर्थात् तुह्मीं ब्राम्ही स्थिती प्राप्त झालेले, परमात्म्याशीं तन्मय बनलेले, उन्मनी अवस्थेंत वावरणारे, परमेश्वराच्या लोकांतच नव्हे, परमेशाच्या समीपच नव्हे, केवळ परमेश्वररूपच नव्हे तर खरोखर त्याच्याशीं पूर्ण सायुज्य पावलेले असेच व्हाल यांत कांहीं सुद्धां संदेह नाहीं.

१० एकंदरींत अशा प्रकारची सायुज्यता संपादन करण्याची बुद्धि, युक्ति व शक्ति श्री जगदंबेनें तुम्हांस द्यावी, अशी जगन्मातेच्या चरणीं नम्र प्रार्थना करून ही लेखमाला येथेंच संपवितों. याचा उत्तरार्ध अर्थात् मातेच्या चतुर्विध स्वरूपांचें स्पष्टीकरण पुढें केव्हांतरी करण्याचें वाचकांस आश्वासन देऊन तें आश्वासन पूर्ण करण्याचें सामर्थ्य, साधन व आयुष्य मला तुझ्या कृपा प्रसादानें मिळो दे, अशी जगदंबेची पुनः एकवार प्रार्थना करून वाचकांची तूर्त रजा घेतों. इति शं।

## ६

**योगमस्त** बाबू अरविंद घोष यांच्या लेखाच्या अनुवादाचा पूर्वार्ध पूर्वींच वाचकांच्या सेवेंत सादर केला आहे. त्याचवेळीं दिलेल्या अभिवचनानुसार आज हा उत्तरार्ध वाचकांना नजर करीत आहे. यांत या विश्वमातेच्या चतुर्विध स्वरूपांचें सुंदर विवेचन आहे.

२ जगन्मातेच्या चतुर्विध शक्तीच तिच्या सुप्रसिद्ध विभूति व अवतार होत. तिच्या ऐश्वर्याचे ते अंश व आविष्कार होत. त्यांच्या द्वारें ती आपल्या सृष्टीवर सत्ता चालविते, चराचर अखिल सृष्ट वस्तूंचे प्रबंध करविते, त्यांचे ऐक्य घडवून आणते आणि आपल्या सहस्त्रावधीं

शक्तिपातानें ती अखिल विश्वाचें व त्यांतील घडामोडींचें नियंत्रण करते. माता तर " एकमेवाद्वितिया " च आहे. परंतु ती विविध व विभिन्न स्वरूपांत आपणास प्रत्यक्ष होत असते. तिच्या शक्ति अनेक, तिचीं रूपें अनेक, तिचे आविष्कार अनेक, तिच्या विभूति अनेक आणि त्या सर्वांकडून तिचें विश्व व्यवस्थितीचें कार्य होत असतें; किंबहुना ती करविते. जगन्माता म्हणून जिची आपण पूजा करतो, तीच या सर्व सृष्टीवर प्रभुत्व गाजविणारी, ऐश्वर्यसंपन्न, सत्तापूर्ण, सर्वज्ञ व सर्वसाक्षी शक्ती होय. ती एक आहे. परंतु इतकी विविध आहे कीं, अत्यंत कुशाग्र बुद्धीला, शीघ्रग्राही मनाला, अत्यंत स्वतंत्र व विशाल समजूतीला सुद्धां तिच्या नानाविध हालचालींचें आकलन करणें दुष्करच नव्हे, तर अशक्य होतें. माता हीच सर्वेश्वराची जाणीव, तीच त्याची शांति व तीच एकंदर सृष्टीचें नियंत्रण करणारी असें आहे, तरी ती ज्या देवतारूपानें मधून मधून आपणास प्रत्यक्ष होते, त्यांच्या द्वारें तिच्या विविध कार्यप्रणालींचें थोडें फार ज्ञान आपणास होत असतें. जगदंबेच्या विश्वविराटरूपाच्या मानानें या देवतांचें स्वरूप, त्यांची कार्यक्षमता व त्यांची स्वभावसत्ता मर्यादित व सुनिश्चित असल्यानें ज्या कोणास त्या प्रत्यक्ष होतात, त्यांना त्यांना त्यांच्या द्वारें होत असलेल्या मातेच्या कार्यांचें थोडें बहुत आकलन व ज्ञान होण्याचा संभव असतो.

३ ज्या चिच्छक्तीच्या आधारावर ही सर्व सृष्टी व आपण जगत आहों, त्या चिच्छक्तीशीं ज्या वेळीं आपलें तादात्म्य होतें, त्यावेळीं मातेचीं तीन रूपें आपणास प्रत्यक्ष होण्यासारखीं असतात. आपल्या तन्मयतेनें त्या तीन रूपांचें आपणास ज्ञान होऊन साक्षात्कार होण्याचा संभव असतो. ती सर्वांगम, सर्वातीत व सर्वोच्च शक्तीच या सर्व सृष्टीचा त्या सर्वेश्वरीय, सदा अव्यक्त रहस्याशी संयोग करणारी सांखळी

होय. समष्टिरूपानें ती विश्वव्यापी महाशक्ति चराचर भूतांना निर्माण करते. या सृष्टींतील लक्षावधि घडामोडीचा व आघात प्रत्याघात व्यवहारांचा तीच उगम होय. तीच त्यांचा आधार. तीच त्यांचा प्रेरक. तीच त्यांचा नियंता. व्यष्टिरूपानें तीच श्री परब्रह्माचे 'आत्मा' रूपांत दोन विशाल व व्यापक आविष्कार करते, तदंतर्गत दिव्य शक्तीला प्रत्यक्ष करते, मानवी व्यक्ति वा जीवात्मा आणि दैवी गति वा परमात्मा या दोघांचा संबंध जुळविते, त्या साठीं मध्यस्थाचें काम करते; आपल्या व्यापक स्वरूपाचें ज्ञान करविते; त्या समीप आपणास नेते व त्याची प्रत्यक्षता आपणास दाखविते व पटविते.

४ सर्वागम, सर्वातीत, सर्वोच्च, एकमात्र शक्तिरूप माता अखिल विश्वाच्या पार राहून आपल्या चिरंतर चैतन्यानें सर्वेश्वराला जागृत करते किंबहुना जन्मच देते. तिच्यामुळेंच तो प्रत्यक्ष होतो, आणि व्यक्त होतो. अनर्गल शक्ति व अनिर्वचनीय स्वरूपाची तीच एकमात्र आश्रय होय. ज्या कोणास त्याला मूर्तिमान करावयाचें असेल, त्याच्या-मध्यें ती अधिष्ठित होते व त्याच्या ठायीं त्याचें आधान करून त्याच्या "निहितं गुहायां" स्थितींतून त्याला खेंचून आणते, मूर्त करते, आपल्या सर्वोपरी चित्प्रकाशानें त्याला दैदीप्यमान करते, प्रत्यक्ष करते, आपल्या सर्वोपरि शक्तीनें त्याला बलसंपन्न करते, आपल्या निःसीम चैतन्यानें त्याला या सृष्टींत एखादा आकार घ्यावयास लावते; अनिर्वचनीय, अव्यक्त, अलक्ष्य, अविकार्य, परब्रह्म, चिरंतन सच्चिदानंदरूप तिच्यामध्येंच प्रथम साक्षात् होतें. किंबहुना तेथेंच तें सदा साक्षात् असतें. तिच्यामुळेंच तें या विश्वांत ईश्वर व शक्ति वस्तुतः एक पण द्विधा भावानें चैतन्यरूपांत प्रत्यक्ष होतें. तिच्या द्वारेंच तें प्रकृति व पुरुष या दोन मूलाधार तत्वांत आविर्भूत होतें; विविध विश्वें, लोकानुलोक, तारामंडलें, देवदेवतादि रूपानें अवतीर्ण

होतें, एकंदर ज्ञात व अज्ञात सृष्टीला आधारभूत होतें व त्यांना नामरूपें देतें. ही सारी तिची परब्रम्हाशीं चाललेली लीला होय. गूढ अनंताचें प्रकटीकरण होय. शाश्वत तत्व गहनतेचें स्पष्टीकरण होय. सर्व कांहीं ती आहे. कारण जें कांहीं आहे तें सारें दिव्य चिच्छक्तीचेंच अंशमय व अंगभूत आहे. ती ठरवील तेंच त्या परब्रम्हास मान्य असणार. त्या व्यतिरिक्त इहत्र व परत्र कांहीं सुद्धां नाहीं. परब्रह्म-बीजानें गर्भित व प्रस्फुरित होत्साती ती ज्याची कल्पना करते, इच्छा धरते, त्याला ती आपल्या प्रसूति आनंदांत प्रांकुरित करून बाह्य सृष्टींत प्रसवते, आकार देते, नामकरण करते. त्या व्यतिरिक्त सृष्टींत अन्य कांहींच आकारमय नामरूपधारी नसतें. तिच्या इच्छेविना कशाला सुद्धां आकार येणार नाहीं. नामरूप मिळणार नाहीं.

५ महाशक्तिरूपानें विश्वाची जननी परब्रह्मापासून आपल्या सर्वांतीत चिच्छक्तीच्या द्वारें जें प्रस्फुरण मिळविते अथवा ज्या प्रस्फुरणाची तिला इच्छा होते, तदनुसार ती सृष्टी प्रसवते आणि त्या सृष्टींत अंतर्हित होऊन राहते. त्या अंतराधनामुळें चराचर सृष्टींत दैवी तत्व संपूरित व संचरित होतें. त्यांत तें ओतप्रोत भरलेलें राहतें. त्याच्या आधारावरच सृष्टि स्थित व स्थिर असते. त्या अंतराधानामुळें सर्वभृत दैवी शक्ती व सर्वप्रसाद दैवी आनंद सर्वत्र पसरलेला व भरलेला आहे. त्याविना या चराचर सृष्टीला कधीं सुद्धां स्थित व स्थिर राहतां आलें नसतें. ज्याला आपण निसर्ग वा प्रकृति ह्मणतो ती केवळ तिची एक अतिव्यक्त कार्यक्षम अवस्था होय. आपल्या विविध कार्य-प्रवृत्तींना व कार्यपद्धतींना ती एकामागून एक या प्रमाणें सुव्यवस्थित रीतीनें गोठविते, व त्यांना एकसूत्री व एकसंवादी करते. निसर्गाच्या कार्याला प्रेरणा देते. जें जें ह्मणून या सृष्ट जीवन चर्येत दृग्गोचर होतें, अनुभवास येतें, व चैतन्य संचालित होतें, त्या सर्वांचा तीच

सूत्रधार होय. आपल्या तंत्रानुसार ती त्यांना नाचविते. सर्वातीत विश्वमातेचाच विश्वात्मा व विश्वदेह, अशा या विविध विश्वांची व सृष्टींची प्रणालि व त्यांमधील प्रत्येक विश्व व प्रत्येक सृष्टी त्या महा-शक्तिस्वरुप सूत्रधारानें चालविलेलें नाटक आहे. त्या मातेनें ज्याची भावना धरली, ज्याचें दृश्य कल्पिलें, ज्याची आपल्या कल्पनेंत योजना केली, आपल्या सौंदर्यपूर्ण, सर्व शक्तिसंपन्न अंतःकरणांत ज्याची रचना केली, आणि आपल्या सर्व प्रसादमय आनंदांत ज्याची निर्मिति केली, त्याचेंच प्रत्येक सृष्ट वस्तु व्यक्त स्वरूप होय.

६ या दिव्य महाशक्तीच्या श्रेणी अनेक आहेत. तज्जन्य लोक पण नानाविध आहेत. ज्या भूसृष्टींत आपण नांदत व वावरत आहोंत, त्या व्यतिरिक्त या सृष्टीच्या स्वरूपाच्या शिरोभागीं अनंत अस्तित्वानें, अगाध चैतन्यानें, अमर्याद कार्यक्षमतेनें आणि अपरिमित आनंदानें परिपूर्ण असें कितीतरी लोकानुलोक पसरलेले आहेत. तसेंच कितीतरी अधोभागीं; कित्येक दक्षिण बाजूस तर कित्येक वाम बाजूस; या प्रमाणें आसमंतांत सभोंवार वसलेले आहेत; आणि त्या सर्वांचा मेरुमणि, जगन्माता, अनावरत, सनातन, शक्तिरूपांत अधिष्ठित झाली आहे. तिच्या हातांखांद्यावर निर्भयपणें खेळत बागडत या असंख्य लोकांतील सृष्टात्मे वर्णनातीत सिद्धिसंपन्नतेचा व विकाररहित एकतेचा सुखा-नुभव व आनंदोपभोग घेत कालक्रमणा करीत आहेत. त्यांत मनातीत महाशक्ति रूपांत माता वास करते आणि आपल्या अचूक कार्य प्रणालीनें, व प्रत्येक व्यवहारांतील सहजसिद्ध स्वयंपूर्णतेनें आपल्या सर्वज्ञ इच्छाशक्तीचा व सर्वसमर्थ ज्ञानसिद्धीचा यथेष्ट परिचय व प्रत्यय करविते. येथील सर्व व्यापार सत्यावलंबी व सत्यपथान्वेषी होतात. येथील सर्व प्राणी दिव्य ज्योतिष्मतीचेच बनलेले आत्मे होत. त्याच दिव्य प्रकाशाचीं त्यांचीं शरीरें व त्याच दिव्य तेजाचें त्यांचें सामर्थ्य

होय येथील सर्व अनुभव नितांत कैवल्यानंदार्णवाच्या ऊर्मी व तरंग व आशय होत. पण येथें या मृत्युभूमीवर ज्या लोकीं आपण जीव धरून आहों, जेथें आपण वावरतों व नांदतों तेथें सर्वत्र गाढ तमोमय अज्ञानाचेंच साम्राज्य अनुभवास येतें. येथील विश्वसंसारांत तन, मन, प्राण यांची त्यांच्या उगमापासून फारकत झाली आहे. त्यांच्या मूलाधाराचा पाया निसटून गेला आहे. सर्वच काळोखांत ठेंचाळत जात आहेत. अनिश्चित स्थितींत गर्क झालेले, अंध असेच लोक सर्वत्र आढळतात आणि त्या सर्वांचें पृथ्वी हें केंद्र आहे, त्यामुळें तिला विशेष महत्व प्राप्त झालें आहे; आणि तिची उत्क्रांति त्या सर्वांच्या करितां एक अत्यावश्यक व अनिवार्य गोष्ट होऊन बसली आहे. पण ही सर्वप्रकारें तमोमय, अंधःकारपूर्ण, अपरिणत, स्वोत्क्रांती प्रीत्यर्थ सदा धडपडणारी, अडखळत, चांचपडत, ठेंचाळत मार्गक्रमण करणारी पृथ्वी सुद्धां त्या विश्वमातेच्या आधारावरच टिकून आहे. त्याच महाशक्ति रूपाकडून तिला प्रेरणा मिळत आहे, तिची चोदना होत आहे, तिची चालना होत आहे व तिची नियंत्रणा होत आहे.

७ तमोमयता, अपरिणतता व सदास्पर्धिष्णुता या त्रयींनीं व्याप्त अशा या मृत्युलोकीं सुद्धां जगदंबा महाशक्तिरूपानें वास करते व मनातीत ज्योतिर्मयता, सत्यजीवन व सत्यसृष्टि, ज्यांचा येथें पूर्ण अभाव आहे व ज्यांचें साम्राज्य येथें प्रस्थापित होणें अत्यावश्यक आहे, इतकेंच नव्हे तर अति श्रेयस्कर आहे त्यांचा प्रसार करते. इतकेंच करून थांबत नाहीं, तर या मर्त्यसृष्टीच्या वरती खालती जे स्वर्ग पातालादि लोक वसलेले आहेत व त्याच्या सभोंवार ज्या अनेक लोक मालिका पसरलेल्या आहेत, त्यांतून तिची चिच्छक्ति जशी विविध प्रमाणांत ओतप्रोत झाली आहे, त्याप्रमाणें ती येथें सुद्धां व्हावी, एतदर्थ तेथल्या सारखीच येथें सुद्धां ती विश्वमाता, जड मूढ अशा

वृत्तींच्या आणि आत्मा, प्राण व मन यांच्या द्वारें आकलनीय अशा अनंत परमात्म्याच्या चैतन्याच्या दोन टोंकांत एकंदर सृष्ट पदार्थ सारखे हेलकावे खात आहेत व येरझारा करीत भ्रमण करीत आहेत, हें जाणून त्यांमध्यें सुसंगति ठेवणारी एक साखळी होऊन बसते; विशेषतः या भूलोकाच्या उत्क्रांतींत व त्या प्रीत्यर्थ या विश्वांत जें जें कांहीं घडणार त्याचा पूर्वनिश्चय करून आपल्या कल्पनेनें त्यांना स्फूर्ति देते व आपल्या संचारकतेनें त्यांना संचालित करते आणि अशा प्रकारें सत्यसृष्टि व मर्त्यसृष्टि या दोहोंमधील सर्व देवदेवतांवर अधिष्ठित होऊन आपल्या सर्वशक्ति किरणांना व व्यक्तरूपांना आपल्या समोर उभें करून त्यांना कार्य संदेश देते व त्यांच्या रूपांत इहलोकीं अवतीर्ण होते. त्यांना अवतारकार्य करावयास लावून त्यांच्या हस्तें येथील अखिल व्यापार व्यवहारांत हस्तक्षेप करिते, त्यांचीं चक्रें फिरविते, त्यांना योग्य मार्गावर आणते, त्यांच्या वैयक्तिक व सामूहिक कार्य सामर्थ्याचें नियमन करते, त्यांचा परस्पर संघर्ष करविते, त्यांचेवर विजय संपादन करून सत्ता चालविते, त्यांचें नियंत्रण करते, स्वतः सूत्रधार बनून आपणांस इष्ट त्या लीला त्यांच्याकडून खेळविते व आपल्या इच्छेप्रमाणें त्यांस नाचविते. आज युगायुगांतरीं विविध नांवांनीं ज्या नानाविध विभूतींची व सृष्ट पदार्थांची मानव जाति देवदेवता ह्मणून पूजा अर्चा करीत आली आहे, त्या सर्व दिव्य तेजान्वित विभूति व वस्तु तिच्याच शक्तीचीं किरणें होत; तिचेच अवतार होत. इतकेंच नव्हे तर आपल्या दिव्य चिच्छक्तींच्या व त्यांच्या व्यक्त अवतारांच्या द्वारें ती त्या सर्व ईश्वरीय विभूतींच्या तन मन प्राणाला समुचितपणें तयार व तत्पर करिते आणि मग त्यांच्या हस्तें या ऐहिक सृष्टींत, या आधिभौतिक लोकांत आपल्या अस्तित्वाचा शक्तिसंपन्नतेचा, गुणवैचित्र्याचा परिचय देवविते. त्यासाठीं ती

त्यांच्या मानवी जाणीवेंत त्यांना आपल्या सच्चिदानंद स्वरूपाच्या एखाद्या किरणाचा प्रत्यय देते व दिग्दर्शन करते. भूलोकींच्या सारा व्यापार 'लीला' ह्मणजे तिचेंच रचलेलें, बसविलेलें व चालविलेलें नाटक होय. त्यांत विश्वांतील सर्व देवदेवतांना ती भिन्न भिन्न भूमिका घ्यावयास लावते व आपण सुद्धां प्रच्छन्न रूपानें स्वतः त्या भूमिका रंगविते. हा सारा तिचा सहज खेळ आहे.

८ जगदंबा सर्वोपरि अधिष्ठित होऊन या विश्वसंसाराचें नियंत्रण करूनच थांबत नाहीं. या कनिष्ठ भुवनत्रयांत अनेक प्रसंगीं ती स्वयं अवतीर्ण पण होते. येथील प्रत्येक वस्तुमात्रांत, अगदीं अंधःकारग्रस्त व्यापारांत सुद्धां तिची अव्यक्त शक्ति व तिची अव्यक्त सृष्टि यांचेंच प्रकृतिशरीर व प्रकृतिसामर्थ्य हें एक अल्पसें प्रदर्शन होय. सर्वाधिष्ठित परमेश्वराच्या रहस्यमय आज्ञाशासनानेंच कार्यक्षम होत्साते ते काल-क्रमणा करीत असतात. अनंताच्या विविध संभाव्य संघटनांपैकीं कांहीं भूमिका ती स्वतःच विलक्षण स्वार्थत्यागाला स्वानुमतीनेंच उद्युक्त होऊन रंगविते व सजविते आणि अज्ञानानें व्याप्त असे आत्मे निर्माण करते व तदनुरूप मर्त्य शरीरें पण धारण करते. पण हें सर्व तिचें अव्यक्त, अप्रत्यक्ष अवतरण होय. यापुढें या लोकाला तमोदेशांतून प्रकाशांत आणण्यासाठीं, असत्यमय व भ्रमपूर्ण दशेंतून विमल सत्या-वस्थेप्रत पोंचविण्यासाठीं, या मर्त्य जीवांना दिव्य जीवनाचा आस्वाद देण्यासाठीं, या सर्वथा दुःखग्रस्त अतीव शोकग्रस्त व असह्य तापत्रस्त संसाराला आपल्या उदात्त आनंदाच्या ऊर्मींनें प्रोत्साहित, मुदित व पुनीत करण्यासाठीं, ती या तमोमय, असत्यपूर्ण, भ्रमयुक्त मर्त्य लोकांत सुद्धां मुद्दाम, समजून सवरून, व्यक्तरूपांत प्रत्यक्ष प्रगट होते, अवतार घेते व मानवी रूपांत कार्यप्रवृत्त होते. आपल्या प्रजेविषयींच्या अकथ-नीय वत्सलतेमुळें व गाढ प्रेमामुळें तीं या मर्त्य लोकाचें तामसिक

अज्ञानावरण पांघरण्याचें पत्करते; येथील असत्याचे व अज्ञानाचे धक्के चपेटे सहन करण्यास व तज्जन्य पीडाकारी परिणाम भोगण्यास तयार होते आणि प्रत्यक्ष मृत्यूचेंच द्वार असें जें जनन त्या मार्गानें या लोकीं जन्म घेण्यास सुद्धां मागें घेत नाहीं. या लोकींच्या सकल दुःखांचा, शोकांचा व त्रिविध तापांचा भडिमार सहन करते. कारण अमर जीवनाचा दीप्तिमान, सत्यमय आनंद त्या एकमात्र मार्गानेंच या मानुषीं जीवांना प्राप्त होईल हें तिनेंच आपल्या जाणीवेंत पूर्वीच निश्चित करून ठेविलेलें आहे. हें त्या जगदंबेचें प्रत्यक्ष मानवी अवतरण. हाच तो महायज्ञ. यालाच कधीं कधीं पुरुषयज्ञ असें हि ह्मणतात. परंतु वस्तुतः तें खरें खरें प्रकृतीचें सर्वस्व बलिदान होय. जगदंबेचा तो महान स्वार्थत्याग होय. मानवी जीवांच्या श्रेयार्थ मातृवात्सल्यानें विश्वमातेनें केलेलें तें आत्मसमर्पण होय.

९ विश्वमातेनें चालविलेल्या या ऐहिक लीलाव्यापारांत, तिच्या या विश्वसंचालन कार्यांत तिच्या चिच्छक्तीचीं चार प्रमुख रूपें तिच्या समोर सदा प्रत्यक्ष होत असतात. आपली कार्यसिद्धि त्याच चार अवस्थांकरवी ती साधीत असते. त्याच चार अवतारांच्या द्वारें ती सर्व सूत्रें हालविते. त्याच चार देवतांच्या हस्तें ती आपले इच्छित हेतू तडीस नेते. त्या चारांपैकीं एक रूप तिची निष्कंप विशालता, तिची सर्वाधिगामी सर्वज्ञता, तिची प्रशांत दयालुता, तिची असीम करुणार्द्रता, तिची सर्वभूतारूढ सत्ता, तिची सर्वानियामक महत्ता, तिची सर्वोच्च प्रभुता व तिची सर्वोत्कृष्ट ऐश्वर्यसंपन्नता याचें प्रकटीकरण हें होय. तिचें दुसरें रूप ह्मणजे तिची उज्वल ओजस्विता, तिची अनिवार्य्य प्रचंडता, तिची दुर्धर्ष वीरवृत्ति, तिची सर्वाक्रमी इच्छाशक्ति, तिची प्रबल जवनिका, तिची सर्वसंसारक्षोभी शीघ्रगामिता व तिची अदम्य समर्थता यांचें आविष्करण हें होय. तिचें तिसरें रूप ह्मणजे तिच्या

## बाबू अरविंद घोष

अलोट सौंदर्याचें, तिच्या अप्रतिम सुस्वरतेचें, तिच्या अखंडित ताल-बद्धतेचें, तिच्या अप्रतिहत नादगुंजनाचें अति मधुर, सुरस व आश्चर्य-मय असें प्रत्यक्षीकरण होय. अर्थात् तिचें अगाध वैभव, तिचें निरवयव सौष्ठव, तिचें प्रसह्य चित्ताकर्षण, तिचें सुमनोहर लालित्य व तिचें प्रसन्न मार्दव यांचें प्रदर्शनच होय आणि तिचें चौथें रूप ह्मणजे प्रत्येक सृष्टींत, प्रत्येक वस्तूंत, प्रत्येक घटनेंत, प्रत्येक स्थितींत व प्रत्येक रचनेंत व्यक्त होणारें तिचें दक्षतापूर्वक वैगुण्यरहित असें कार्य, त्यांत दिसून येणारें तिचें अविचालित सार्थ असें नैपुण्य, अति प्रगट, गहन व गाढ असें ज्ञान यांनीं परिपूरित असें तिचें धारणासामर्थ्य हें होय. सारांश सर्वार्थग्राही प्रज्ञा, विश्वविजयी शक्तिमत्ता, सर्वसंविधायक एककारिता व सर्वसंपन्न कुशलता हीं त्या चार रूपांचीं अनुक्रमें मुख्य लक्षणें होत; आणि तदनुरूप सत्ता सामर्थ्य घेऊनच तीं या लोकीं अवतीर्ण होतात. ज्या मानवी विभूतीद्वारें तीं इहलोकीं व्यक्त होतात त्यांच्यामध्यें या चतुर्विध लक्षणांपैकीं कोणत्या तरी एकाचें प्रामुख्यानें वास्तव्य व प्राबल्य आढळून येतें; आणि जे कोणी आपल्या ऐहिक विषयावलिप्त मानवी हृदयाचें द्वार मोकळें ठेवून तेथें श्रीजगदंबेचें प्रत्यक्ष व चैतन्यमय अधिष्ठान व्हावें ह्मणून प्रयत्नशील होतात, त्यांच्या ठायीं तीं आपल्या दैवी शक्तीचे आधार करून तेथें दैवी साम्राज्याची प्राणप्रतिष्ठा करतात आणि त्यांच्या करवीं दैवी संपत्तीचा परिचय देववितात. या उपरिनिर्दिष्ट चार रूपांनाच अनुक्रमें माहेश्वरी, महा-काली, महालक्ष्मी व महासरस्वती अशीं चार नांवें आह्मी मर्त्य देत असतो. इति शं.

## ७

जगदंबेच्या चतुर्विध रूपांतील सर्व प्रथम विभूति म्हणजे सम्राज्ञी माहेश्वरी. ही विचारप्रवण मनः-क्षेत्राच्या व आचार-प्रवाहक इच्छाप्रदेशाच्या अफाट प्रांताची अधिष्ठात्री होऊन त्यांना अति-सूक्ष्मग्राही व अतिदूरदर्शी करून त्यांची प्रज्ञा व व्यापकता वाढविते; आणि आपल्या स्वयंप्रभ तेजानें त्यांना दैदिप्यमान करीत तद्बाह्य दिव्य तेजाच्या अलोट पूरांत त्यांना वाहून नेते. मनातीत अनंत विश्वांचें, अखिल विश्वचक्रांच्या विशालतेचें, परब्रह्माच्या दिव्य ज्योतिर्मय तेजाचें, मातेच्या सनातन सत्तेनें संचालित असंख्य हाल-

चालींचें, आपणास दिग्दर्शन करविणारी तीच एक सर्वज्ञ, सर्वसमर्थ देवता होय. ती सदा आश्चर्योत्पादक, महान कुतूहलपूर्ण, प्रशांत व प्रसन्न असते. सर्व प्रजा तिजपासूनच उद्भवत असल्यामुळें तिला केव्हांही कोणत्याही प्रकारें विचारचांचल्य प्राप्त होत नाहीं. जें जाणण्याची तिला इच्छा होईल तें तिजपासून चोरून ठेवितां येत नाहीं. सर्व चराचर वस्तु व प्राणी, त्यांचे गुणधर्म व प्रकृतिस्वभाव, त्यांच्या साऱ्या प्रवृत्ति व निवृत्ति, एकंदर जगाच्या स्थिती व अवस्था, विश्वनियामक निर्बंध व त्यांचे कालचक्रानुक्रम, वर्तमान, देश व परिस्थिति, सारांश, काय आहे, कसें आहे, कां आहे, होतें कसें, व झालें कसें, आणि कसें असलें पाहिजे आदि आदि सर्वांचें एकसमयावच्छेदेंकरून तिला सहज आकलन होतें. प्रत्येक घटनेला तोंड देऊन त्यांत विजय संपादन करण्याचें सामर्थ्य तिच्यांत अंगभूतच असतें. तिचें ज्ञान अगाध, त्रिकालदर्शी, सर्वगामी, त्याचें आकलन होणें किंवा परिमापन करणें शक्य नाहीं. तिची शक्ति अपरिमित व अजेय; त्यामुळें तिच्यापुढें कोणाचा सुद्धां टिकाव लागत नाहीं. सदा सम बुद्धीनें, धीरोदात्त वृत्तीनें व अविचलित इच्छाप्रवृत्तीनें ती मानवी जीवाशीं लीलेनें क्रीडा करते व वस्तुमात्रांशीं, प्रत्येक परिघटनेशीं त्यांतील तथ्यानुसार व त्यांतील सत्वानुरूप खेळ खेळते. पक्षपात काय असतो, हें तिला ठाऊकच नसतें. ती केवळ परब्रम्हाची इच्छानुवर्ती असते. कांहींना ती वर ओढते, तर कांहींना खालीं ढकलते. कित्येकांना वर आकाशांत फेंकते, तर कित्येकांना खोल अंधकूपांत लोटते. प्रज्ञावंतास ती अधिक तेजोमय ज्ञान देते. ज्यांना आत्मदृष्टिप्रत्यय झाला असेल त्यांना ती आपल्या परिवारमंडळांत दाखल करून घेते. तिच्या विरोधकांना त्या विरोधाचें कटु फल चाखावयास लावते. अज्ञ व मूर्ख यांना त्यांच्या गुणकर्मानुसार ती आंधळ्यांसारखी हात धरून चालविते. मनुष्य-

मात्राच्या स्वभावधर्मकर्मानुसार वृत्तीला ती स्थिर करते व संचारित करते. त्यांच्या आवश्यकते प्रमाणें, त्यांच्या उत्कटते प्रमाणें, त्यांच्या फलाकांक्षे प्रमाणें ती त्यांना कार्यप्रेरणा देते, त्यांना ईप्सित स्वातंत्र्य देते, आणि अशा नाना प्रकारें त्यांना नाचविते व त्यांच्या अहंमन्यतेच्या गर्तेतच त्यांना पचत ठेवते, किंवा अज्ञानाच्या खाईतून त्यांना वर उचलून ठेवते. ती सर्वोच्च आहे. तिला मर्यादा घालणारें दुसरें कोणी-सुद्धां नाहीं. तसेंच या सर्व विश्वसंसार क्रीडेंत तिची आसक्ति पण कोठेंहि कशांतही नाहीं. तथापि जगदंबेच्या मातृवत्सलतेचा ओलावा तिच्या या माहेश्वरी रूपांत इतरांपेक्षां अधिकतर प्रमाणांत वसत असतो. तिची कारुणिकता अपार व अखूट आहे. तिच्या समदृष्टींत सर्व चराचर वस्तु तिचीं लेंकरेंच होत. असुर झाले, दैत्य झाले, दानव झाले, राक्षस झाले, पिशाच्च झाले, निषाद झाले, तिच्याशीं वैर बांधणारे, तिच्या विरुद्ध बंड उभारणारे, तिच्या घातास प्रवृत्त होणारे, तिच्या नाशाचा विडा उचलणारे, यांच्यावर सुद्धां तिची मातृभावना-नुरूप कृपादृष्टिपूर्ण वृष्टि होतच असते. हा बाबापुता आणि तो कारटा हा द्वैत भाव तिला शिवतच नाहीं. तिचें दूर ढकलणें सुद्धां वात्सल्यपूर्ण असतें. केवळ कांहीं काळ दूर केल्यासारखें असतें. तिनें केलेलें पारिपत्य सुद्धां तिच्या कारुण्यमयतेचा प्रसादच होय. असें असलें तरी तिची करुणवृत्ति, तिचें मातृप्रेम तिला आंधळें करीत नाहीं; किंवा तिच्या ज्ञानप्रकाशाला मलिन करीत नाहीं. त्यामुळें गुणकर्मविभागशः निश्चित व नियोजित कार्यांत कधींहि अंतर पडणार नाहीं. कारण वस्तुमात्रांतर्गत सत्व व सत्य हाच काय तो तिचा कार्य विषय होय. सम्यग्ज्ञान हेंच तिचें सत्ताबीज; आणि दिव्य सद्वस्तूशीं मानवी जीवाचें लग्न लागावें म्हणून त्याचा अंतरात्मा व देहस्वभाव यांना त्या प्रीत्यर्थ समुचित रीतीनें तयार करणें हेंच तिचें उद्दिष्ट व जीवशिव ऐक्यांत त्याची पूर्ती

करणें हेंच तिचें कार्य होय. जीवात्मा व परमात्मा यांची भेट करविणें हेंच तिचें अंतिम साध्य होय.

२ महामाया विश्वमाता जगदंबा हिचें महाकाली हें दुसरें रूप. महाकाली माहेश्वरीहून अगदींच भिन्न प्रकृतीची आहे. विशालता, व्यापकता हा तिचा विषय नव्हे. प्रज्ञा हा पण तिचा प्रांत नव्हे. उंच उंच भराऱ्या मारणें, अत्युच्च प्रदेशांत भ्रमण करणें तिला आवडतें. तीव्र प्रेरणा, प्रबल सामर्थ्य, यांतच तिची सत्ता व प्रभुता व्यक्त होते. तिच्यामध्यें सर्वातिक्रामी प्रचंडता आहे. कार्यसिद्धीची प्रबल प्रेरणा, व तीव्रता पण आहे. प्रत्येक अडचण ठोकरीनें उडविणारें, प्रत्येक बंधन लाथेनें झुगारून देणारें, प्रत्येक दौर्बल्याला झिडकारणारें, कोणत्याहि मर्यादेला भीक न घालणारें व कशाहि विरोधाला न जुमानणारें असें दिव्य साहस तिच्यांत आहे. प्रचंड झंझावाताप्रमाणें प्रक्षुब्ध कार्यभास्वर्तेतच तिची देदीप्यमान दिव्यता उत्कटतेनें प्रतीत होते. कार्य सिद्धीचा प्रबल वेग, तात्कालिक पर्यवसायी कार्यपद्धति, एकामागून एक अति त्वरेनें करण्यांत येणारे प्रत्यक्ष आघात व प्रहार, उलट बाजूनें होणारे प्रत्याघात व प्रहार यांचें द्रुतगतीनें केलेलें निराकरण, समोर उभें राहून दंड फटकारून केलेलें आक्रमण, उघड उघड निर्भयतेनें केलेलें युद्धाव्हान, वाटेंत जें जें आडवें येईल त्याला कापून काढण्याचें नैष्ठुर्य, विरोधकांचें समूळ उच्चाटण, ही तर तिची सहज लीला होय. असुरदैत्यांना तिची मुद्रा भयानक व्याघ्रमुखी दिसते; ईशद्रोह्यांना तिची वृत्ति निष्ठुर व भयंकर उग्र भासते. वस्तुतः या विश्वांतील वीरवृत्ति तीच होय. युद्धास पराङ्मुख न होणारी, लढाईस न कचरणारी, संकटांस न जुमानणारी, प्रत्यक्ष मृत्यूस सुद्धां न भिणारी, एक मात्र पराक्रम मूर्ति तीच होय. कसल्याहि वैगुण्याची तिला अतिशय चीड येते. या व्यंगासहिष्णुतेमुळें मानवी प्राण्यांत जे कोणी

अतत्पर, अश्रद्ध, संशयखोर तिला आढळतात त्यांचा ती खरपूस समाचार घेते. अज्ञानांधकारावलिप्ततेनें ज्या कोणास काठिण्य व दार्ढ्य प्राप्त झालें असेल, त्यांचा ती अगदीं कठोरपणें योग्य परामर्ष घेते. विश्वासघात, मिथ्याचार, नृशंसता, आत्मद्रोह या विरुद्ध तिच्या क्रोधाचा तडाखा तत्काल व अतिभीषण असतो. ईर्षा, असूया, द्रोह यांना तिच्या चाबकाचे फटकारे ताबडतोब मिळतात. ईश्वरनिर्दिष्ट कार्यांत कोणीहि औदासीन्य, आलस्य वा दुर्लक्ष्य केलेलें तिला खपत नाहीं. आणि असे जे कोणी अकालीं झोंपीं जातात, किंवा आरामप्रिय होतात किंवा निश्चिंत राहून असावध राहतात आणि व्यर्थ कालक्षेप करून आयुष्य गमवितात, त्यांना ती लगेच थप्पड मारून व प्रसंग पडल्यास चांगले दंडुक्याचे धपाटे मारून, जागें करून स्वकार्योद्युक्त केल्याशिवाय कधींच रहात नाहीं. त्याशिवाय तिला स्वस्थ बसवतच नाहीं; चैनच पडत नाहीं. सवेग, सरळ व निष्कपट अशी कार्यप्रवृत्ति, निरवशेष, पर्याप्त व इष्टपर्यवसायी अशीं कार्य संचालनें, उन्नत, उदात्त व दीप्तिमंत अशा महत्कांक्षा याच महाकालीच्या गती होत. तिचा कार्योत्साह अदम्य, तिची संचालनदृष्टि गगनगामी, गरुडाप्रमाणें सुदूरदर्शी, तिची स्पृहास्फूर्ति आकाशाच्या पोकळीचा ठाव घेणाऱ्या वैनतेयाप्रमाणें सुदूरगामी, उच्चाभिलाषी व प्रबलवेगशाली असते. तिचे चरण सदाद्रुतगामी व उन्नत पथ दर्शक होतात, तिचे हात सदा प्रहारोद्युक्त व सदा अभय वरदायी, असे सतत पुढें आलेले असतात. पण किती झालें तरी ती सुद्धां अखेरीस मातेचेंच स्वरूप आहे ना ? त्यामुळें तिच्या ठायीं सुद्धां तीच मातृवत्सलता पूर्णांशानें वसत असते. जसा तिचा क्रोध प्रचंड तसें तिचें वात्सल्य पण अगाध. अलोट व उत्कट व गाढ दयार्द्रतेनें ती सदासर्वदा ओथंबलेली असते. प्रार्थनापूर्वक मनोभावें तिची उपासना केल्यास आपल्या सर्व शक्तिवैभवासह

प्रसन्न होत्साती भक्ताच्या साह्यार्थ ती धांवून येते आणि मग क्षणार्धांत तिच्या उपासकांच्या शत्रूंची वाताहत होते. त्यांच्या मार्गांतील सारीं विघ्नें एखाद्या ठिसूळ पदार्थाप्रमाणें छिन्नभिन्न होतात. शत्रूंना तिचा क्रोध भयप्रद आहे. भ्याड व दुर्बलांना तिच्या प्रभावाचा वेग दुःसह व दुःखद आहे. तरी पण उदात्त, शक्तिशाली, ज्ञानशील, महान् भजकात्मे तिचीच पूजा करतात. तिचीच ते आराधना करतात; तीच त्यांचें परमप्रिय सर्वोपास्य इष्ट दैवत होय. कारण स्वतःमध्यें जें जें मातृद्रोही द्रव्य असेल त्याला धोपटून, सडकून ती सत्यस्वरूप व सामर्थ्यपूर्ण करते. जी जी कुटिलता व पिशुनता असेल त्यावर घणाचे घाव घालून ती त्यांत ऋजुता व मार्दव आणते. जें कांहीं अशुद्ध व अपरिणत असेल त्याला पिटाळून लावून तेथें पावित्र्य व पक्वता वसविते, अशी त्यांची श्रद्धा असते व तसा त्यांना अनुभव पण येतो. जें कार्य सिद्ध होण्यास तिच्या कृपाप्रसादामुळें एकच दिवस लागतो तेंच तिचें अधिष्ठान नसल्यास सिद्धीस जाण्यास शंभर शंभर वर्षे सुद्धां पुरीं पडत नाहींत. तिच्या आधानाच्या अभावीं होणारा आनंद कितीहि विशाल, गंभीर, सौम्य, मधुर व सुंदर वाटेल तरी तो तिच्या सांनिध्यानें प्राप्त झालेल्या त्यांच्या पराकाष्ठेच्या केवलतेनें त्यांना मिळणाऱ्या उज्वल प्रमोदापुढें शून्यवत् भासतो, फिका पडतो, निरस वाटतो, भेसूर दिसतो. खरा तेजोमय, सर्वांगपरिपूर्ण, सत्यसुंदर, नितांतमधुर अति सोज्वल आल्हाद तिच्या अधिष्ठानांतच वसत असतो. ज्ञानाला ती सर्व विघ्नोपहारी सामर्थ्य देते, सौंदर्याला ती पौर्णिमेची पूर्ण भरती आणते, स्वरसंगीताला ती मधुरोत्तान करते. तानालापांना ती उंच उंच वर वर उसळणाऱ्या उर्मींनीं सुशोभित व सुनिनादित करते. अति मंदगतीनें व अति प्रयासानें चालविलेल्या दुष्कर कार्यालाही आपल्या अधिष्ठानानें

प्रवाहित व गमनशील करून त्याची क्रियाशक्ति शतगुणित वाढविते. दीर्घकालीन दुष्काम्य कार्य सिद्धीचा मार्ग सुकर करून शीघ्र सिद्धि प्राप्त करून देते. उदात्ततम ध्येय, उच्चतम आरोहण, परमतम आनंदोर्मी, विशालतम कार्यव्याप्ती, शीघ्रतम क्रियासिद्धि या शिवाय तिचें समाधानच होत नाहीं. सर्वोत्कृष्टतेमध्यें यत्किंचित सुद्धां वैगुण्य आलेलें तिला सहन होत नाहीं. तिच्या ठायीं दिव्य यशस्वितेचें बीज आहे. परमेश्वराची यशोदायिनी सत्ता तीच आहे. परमलोकाच्या नादीं न लागतां इहत्रच जो कोणी आपलें इष्टापूर्त अभ्युदय निःश्रेयस स्वार्थपरमार्थ साधूं इच्छील त्यानें तिच्या मातृवत्सलतेवर अटल श्रद्धा ठेवून तिच्या भजक प्रेमावर पूर्ण विसंबून तिच्या प्रबलतेची, तिच्या अभिनिवेशाची, तिच्या आवेगाचीच आराधना करून तिला प्रसन्न करून घेतलें पाहिजे. भीरुता, औदासीन्य, आलस्य, यांना दूर सारून वीरोचित साहस धैर्य शौर्य यांचा अवलंब करूनच महाकालीची उपासना केली पाहिजे.

३ याप्रमाणें प्रज्ञारूपांत माहेश्वरी व शक्तिरूपांत महाकाली अशीं जगन्मातेचीं दोन प्रकटरूपें होत. पण तिच्या ऐश्वरीभावाचें याहून सूक्ष्मतर असें आणखी एक रूप आहे. तें सुद्धां रहस्यमय व गूढ आहे. त्या विना हीं प्रज्ञास्वरूपें व शक्तिस्वरूपें एक प्रकारें अपूर्णच होत. या तिसऱ्या स्वरूपाचा मिलाफ झाल्याखेरीज कोणतीहि संपूर्णता परिपूर्ण झाली असें ह्मणतां येत नाहीं. पूर्वं वर्णित दोन्ही स्वरूपांच्या पलीकडे शाश्वत सौंदर्यानें फुललेलें, आश्चर्योत्पादक असें तिचें एक तिसरें स्वरूप आहे. तेथें दिव्य सौख्याचें गुह्यमत, अज्ञेय बीजच वास करतें. भूतमात्र, प्राणिमात्र, क्रियामात्र, व घटनामात्र साऱ्यांना एकवटणारें व परस्परावबद्ध करून ठेवणारें आकर्षणतत्व तेथेंच सांठविलेलें आहे. सर्व विश्वांना मोहित करणारी, आकर्षित करणारी मोहिनी

आपल्या अनिवार्य मोहकतेनें व मनोहारित्वानें तेथेंच विलास करते. तिच्या अनुल्लंघनीय मायाव्यामोहांत गुरफटून, तिच्या लीलाजालांत अडकलेलें विश्वजात विविध नाचरंग खेळत, तिच्या प्रच्छन्न व गूढ आनंदाचा उपभोग घेतें. स्वतः पडद्या: आड राहून ती त्यांच्यावर त्या आनंदाचा सारखा पाऊस पाडीत असते. आणि हें सारें करणारी कोण तर ' महालक्ष्मी ' हेंच जगन्मातेचें तिसरें स्वरूप होय. तें सुंदर, सुमधुर, अतिमनोहर, आनंदमय, आल्हादकारी रूपच या लोकीं सर्वांना विशेष प्रिय होतें. तिच्या इतकें अन्य कोणतेंहि दैवत त्यांना प्रिय वाटत नाहीं. माहेश्वरी तिच्या प्रशांत गंभीर स्वभावामुळें मर्त्य जीवांना दुर्धर्ष व दूरस्थ वाटते. तिच्या महत्तेचें आकलन आपल्या क्षुद्र वृत्तीकरवीं करणें त्यांना अति दुष्कर वाटतें. महाकाली तर सहजच त्या दुर्बलांना दुःसह, भयानक व प्रबल वेगवती भासते तिचे रपाटे खाणें त्यांच्या जीवावर येतें. तिची प्रचंड कार्यप्रेरणा त्यांना असह्य होते. परंतु महालक्ष्मीची गोष्ट मात्र तशी नाहीं. तिची उपासना प्रत्येकाला मोठ्या आवडीनें व आनंदानें करावीशी वाटते. तीच त्यांचें प्रिय, इष्ट व आराध्य दैवत बनते. कारण परमेश्वराच्या उन्मादकारी माधुर्याचा मोहिनी मंत्र ती सर्वांवर घालते. तिच्या सांनिध्यांत राहणें परम सुखकारी होय. आपल्या हृदयांत तिच्या अधिष्ठानाचा अनुभव येणें ह्मणजे सारें जीवित सदानंदी व अभिनव आल्हादभोगी होणें होय. सूर्याचीं प्रकाश किरणें सर्वत्र पसरून वस्तु मात्राला ज्याप्रमाणें उज्वल व दृग्गोचर करतात, त्याचप्रमाणें तिच्या प्रसादाची वत्सलतम मोहिनी प्राणिमात्राला प्रमुदित व प्रोत्साहि करते. जेथें जेथें तिच्या कृपाकटाक्ष पडतो, जेथें जेथें तिच्या मधुर हास्याच्या लकेरीची प्रभा फांकते तेथें तेथें आनंदी आनंदच पसरलेला दिसून येतो. प्राणिमात्र त्या आनंदांत गर्क झालेला, परिबद्ध झालेला, अथांग अशा आनंद

सागरांत बुडून गेलेला भासतो. तिच्या करस्पर्शामध्यें विलक्षण जादू भरलेली आहे. त्याच्या अगोचर पण नाजूक प्रभावानें मन, प्राण, इंद्रियें सर्व पुनीत व शुद्ध होतात. जेथें जेथें तिची चरणधूली पडते तेथें तेथें हर्षोन्मत्त करणाऱ्या आनंदोदधीच्या आश्चर्यजनक प्रवाहाचे लोटच्या लोट वाहूं लागतात.

४ हें सारें खरें पण या मोहिनी मूर्तीच्या मागण्या पूर्ण करणें किंवा तिचा साक्षात्कार सदा जागृत ठेवणें हें कांहीं सहज वा सोपें काम नव्हें. ती प्रसन्न व्हावी अशी इच्छा असेल तर तिच्या मागणी प्रमाणें मन व आत्मा यांच्यामध्यें मधुर सुंदर स्वरैक्य साधलें पाहिजे. विचार व विकार यांचें सौंदर्य, प्रत्येक व्यक्त कृति व गति यांचें एकलयी सुंदर माधुर्य, आपली जीवनचर्या व तद्वेष्टित परिवार यांचें सुद्धां एकसूत्री सुंदर मधुर स्वारस्य संघटित केलें पाहिजे. हीच त्या महालक्ष्मीस्वरूपाची प्रथम मागणी होय. ती पूर्ण केली तरच ती प्रसन्न होणार. जेथें विश्वांतर्गत अव्यक्त आनंदोर्मीच्या तालबद्धतेशीं समतोलता असेल, जेथें विश्वपूरित सर्वमोही माधुरीच्या सुंदरनादाला तसाच मधुर सुंदर प्रतिनाद मिळेल, जेथें दिव्य जीवनाच्या नानाविध प्रवाहाशीं एकतानता, एकस्वरता व एकलयता असेल अशा वातावरणांतच महालक्ष्मीचा वास संभवतो व तशा सुंदर मधुर तन्मयतेंतच निवास करणें तिला पत्करतें. तसेंच जें जें ह्मणून कुरूप, क्षुद्र व नीच आहे, जें जें ह्मणून कृपण, मलीन व जघन्य आहे, जें जें ह्मणून क्रूर, नृशंस व पाशवी आहे तें तें तिला तिरस्कारणीय वाटतें, त्या योगें तिचें आह्वाहन होणें दुरापास्त होतें तिच्या आगमनाला तें सारें दूर ढकलीत असतें जेथें प्रेम नाहीं, सौंदर्य नाहीं, माधुर्य नाहीं आनंद नाहीं, तेथें महालक्ष्मी पण नाहीं जेथें प्रेमाचा उद्भव होणें दुष्कर होय, जेथें प्रेमाचा उद्भव होणें दुष्कर होय, जेथें सौंदर्याची शोभा येणें

कठीण होय, जेथें माधुर्याचा स्वाद घेणें दुर्घट होय, जेथें आनंदाचा बहार येणें दुरापास्त होय तेथें महालक्ष्मीचें आगमन होणेंहि अशक्य त्या ठिकाणीं येण्याचें ती साफ नाकारिते. तसेंच सुंदर, मधुर आनंदी प्रेमाचा वास असलेल्या ठिकाणीं तिचें आवाहन झाल्यानें यदाकदाचित तिचें आगमन झालें तरी त्यांतील शुद्धता नष्ट झाल्यास, सरमिसळीनें त्यांत वैगुण्य आल्यास, क्षुद्रतर भावनांनीं वा वस्तूंनीं त्यांस विकृतरूप केल्यास मग तिची बसति फार दिवस टिकत नाहीं. थोड्याच अवधींत ती पाठ फिरविते. किंवा आपल्या अमोघ संपत्तीची वृष्टि करण्याचें टाळतें; तसा वर्षाव करावेंसें तिला वाटत नाहीं. मानवी अंतःकरणांत अधिष्ठित होतांना किंवा तेथें अधिष्ठित झाल्यावर सुद्धां जर त्या ठिकाणीं तिला विश्वासघात, हावरेपणा, कृतघ्नता यांनीं येथील पावित्र्य दूषित झालेलें, व शुद्धता बिघडलेली दिसली जर तेथें क्षुद्र स्वार्थ, द्वेष, असूया, मत्सर, कुबुद्धि, वैमनस्य, यांची तिला दुर्गंधि आली, जर गर्हणीय विषयलालसा व अश्लील विकारेच्छा यांनीं तेथील आराधन-सामग्री मलिन व अपवित्र झालेली आढळली, तर तेथें ही प्रसादमूर्ति सुहास्यवदना, चारुगात्री, आमोदवर्षिणी देवी एक क्षणसुद्धां विसंबत नाहीं. त्यांचा तिला तीव्र तिटकारा येतो व ती तेथून तात्काल प्रयाण करतें; अंतर्धान पावते व निघून जाते. अशा ठिकाणीं आग्रहपूर्वक निवास ठेवून तंटेबखेडे माजवीत आपलें स्थान टिकविणें, प्रस्थान कायम करणें, वसति स्थिर करणें, वर्चस्व प्रस्थापित करणें हा तिचा स्वभावच नव्हे, तें तिला ठाऊक नाहीं; तें तिला आवडत नाहीं व त्या भानगडींत ती कधी सुद्धां पडत नाहीं. फारच झालें तर आपलें सर्वांग झांकून घेऊन, डोळे मिटून स्वस्थ पडून राहून ती त्या कडु, विषमय, सैतानी वृत्तींच्या निराकरणाची व त्यांच्या समूळ उच्चाटनाची वाट पहात बसते. आणि तोंपर्यंत ती आपला सदा प्रवाही प्रसादौघ

आंवरून धरते आणि त्या पाशवी वृत्तींचा नायनाट झाल्यावरच ती त्या ओघाला पुनः संचारित करून आपल्या कृपामृताचा वर्षाव करूं लागते. लवमात्रहि क्षुद्र पाशवी वृत्तीचा वास असे तों पर्यंत तिच्या प्रसन्नतेची अपेक्षा करणें व्यर्थ होय. वैराग्याचें दैन्य व दार्ढ्य तिला रुचत नाहीं. अंतःकरणाच्या मृदुल सहजोर्मींचा निरोध, आत्म्याच्या स्वभावमाधुर्याचें कठोर मर्दन, किंवा जीविताच्या नैसर्गिक सौंदर्याचें प्रस्तरमय संयमन व विरूपीकरण तिला बिलकुल आवडत नाहीं. प्रेममाधुर्य व स्वभावसौंदर्य हेच तिचे दोन दिव्य गुणधर्म होत. त्या योगेंच मानवी जातीला स्वर्गीय आनंदाचा परिचय देण्याचें कार्य ती करीत असते. तिच्या कार्यप्रणालीमुळेंच मानवी जीवन हें एक स्वर्गीय कलेचें प्रदर्शन बनतें. सारी जीवनचर्या एक आनंदमय, दिव्य व पूज्य काव्य होतें. जगांतील सारी संपदा, सारें ऐश्वर्य तिच्या दिव्य संदेशसिध्यर्थंच एकत्र होतात आणि अगदीं साध्या क्षुल्लक सामान्य वस्तू सुद्धां तिच्या एकीकरणाच्या अंतःप्रेरणेनें, तिच्या दिव्योत्साहाच्या श्वासानें, तिच्या सुस्वर नादमाधुर्यानें संचालित होऊन अभिनव तांडव करूं लागतात आणि आपल्या ईश्वरीय निर्मितीचा परिचय देत आश्चर्यचकित करतात व आपल्या दिव्य एकताननेतेनें दिङ्मूढ करतात. अंतर्यामीं तिचें अधिष्ठान होतांच ती मानवी प्रज्ञेला कुतूहलजनक उच्च शिखरावर नेऊन सोडते, आणि साऱ्या ऐहिक विज्ञानाला अगम्य अशा ज्ञानविज्ञानातीत परमानंदसागराच्या निगूढ रहस्याचा स्फोट करून मानवी जीवाला त्यांत यथेष्ट अवगाहन करूं देते. श्रद्धेला दिव्याभिनिवेशानें प्रोत्साहित करते, परम तत्वाचें ठिकाणां स्थिर करते व तज्जन्य अनुभवानें प्रमुदित व प्रफुल्लित करते. बलसंपन्नता व क्रिया-सामर्थ्य यांना ती तालबद्धतेचें, एकलयतेचें व एकतानतेचें शिक्षण देते; त्यांना आपल्या साऱ्या क्रिया व शक्ती एकरूप, तन्मय व प्रमाण-

बद्ध करावयास लावते; परमेश्वरी स्थितीशीं त्यांना संबद्ध करते; त्यांच्या अपूर्णतेवर, अपरिणततेवर, त्यांच्या मर्यादाबद्धतेवर, त्यांच्या संकोचशील-तेवर आपल्या दिव्य तेजाच्या सुंदर, मधुर, विश्वमोहिनी, सदानंदी व सर्वाल्हाददायी मंत्राची फुंकर घालते आणि त्यांना सतेज, सजीव व शाश्वतस्थायी करते. हाच महालक्ष्मीचा या लोकीं खरा प्रसाद होय.

## ८

**नंतर** महासरस्वती हें जगदंबेचें चौथें स्वरूप होय. प्रज्ञारूप माहेश्वरी, शक्तिरूप महाकाली, सौंदर्यरूप महालक्ष्मी तर क्रियारूप महासरस्वती होय. या रूपानें जगन्माता सुव्यवस्था व परिपूर्णता साधते. चतुर्विध रूपांत मातेचें हें रूप सर्वांत धाकटें ह्मणून अतिशय लाडकें रूप होय. भौतिक निसर्गाशीं याचें निकट सांनिध्य आहे. क्रियासिद्धी-मध्यें परम कुशल, अति दक्ष व सदा यशस्वी असें हें आहे; किंबहुना सर्वांगपूर्ण क्रियासिद्धि हाच त्याचा परम विशेष होय. जगदंबेच्या या चतुर्विध स्वरूपी व्यक्त देवतांपैकीं पहिली माहेश्वरी ही विश्वांतर्गत

क्रिया शक्तींच्या कल्पनारूप रचना करून त्यांच्या स्थूल रूपरेषा आंखून देते; दुसरी महाकाली त्या क्रियांना प्रेरणा देऊन गति देते व त्यांना नियत रीतीनें संचारित करते; तिसरी महालक्ष्मी त्या स्थिति गतींना तालबद्ध प्रमाणशीर करून एकरूप करते व त्यांना सुमनोहारिता आणते, तर चवथी महासरस्वती त्या प्रत्येक स्थितिगतिरूप क्रियेच्या सूक्ष्मातिसूक्ष्म कृतीची व गतीची अधिष्ठात्री होऊन त्यांचें सुचारु संगठन करते, त्यांच्या विविध अंगप्रत्यंगाला सुसंबद्ध ठेवते, त्यांच्या विभिन्न गतिरूपांना एकसूत्री करते, व त्यांत प्रमाणबद्धता राहील अशी व्यवस्था ठेवते आणि सर्व क्रियांचें समुचित संचालन करून त्यांना इष्ट पर्यवसायी करते आणि अंतीं त्या सर्वांच्या विविधतेंतून, त्यांच्या विभिन्नतेंतून ती आपल्या व्यवस्था चातुर्यानें, कार्य कौशल्यानें संघटन नैपुण्यानें व इष्ट सिद्धि दक्षतेनें, अचुक, निश्चित, ईप्सित, उद्दिष्ट परिणामांत विश्वकार्य परिणत करते. वस्तुमात्राच्या अंतःस्थ परिमाणाचें वैज्ञानिक आविष्करण, त्यांच्या कार्यपद्धतीचें कौशल्यपूर्ण संकलन, त्यांच्या वैशिष्याचें यथानियत संरक्षण हा सर्व त्या महासरस्वतीचाच कार्यभाग होय. कार्यकुशल कारीगराचा स्वकार्य-दक्ष-हस्त, स्वकार्य-समीक्षक नेत्र, स्वकार्याभिज्ञ मनोनिवेश यांच्या संयोगानें कार्यांत येणारी सुबकता, सुरूपता व सुंदरता, तसेंच त्यासाठीं अपरिहार्य असलेली अंतर्यामींची निश्चित योजना, रचनाभिज्ञता, निरीक्षण सूक्ष्मता व धीरोदात्त तितीक्षा व त्यांच्या योगानें व्यक्त होणारें कार्य नैपुण्य, कृति सौंदर्य, आकार माधुर्य व रचना चातुर्य, हीं सारीं महासरस्वतीचींच लक्षणें व प्रसादचिन्हें होत. हें सर्व तिच्या अंगीं वसत आहे. ज्या कोणावर ती प्रसन्न होते त्याला त्यांचा आमोदपूर्ण आस्वाद व आल्हाददायक उपभोग घेतां येतो. जगदंबेच्या शक्तीचें हें स्वरूप ह्मणजे अखिल विश्वांची रचना करणारें, त्यांतील विविध भागांची

समुचित योजना करणारें, त्याचें भिन्नभिन्न वर्गीकरण करणारें स्वरूप होय. एकंदर विश्वाची इमारत उभारणारा, अति समर्थ, अविश्रांत, सदक्ष. परिश्रमी कार्यकर्ता, विधाता, व्यवस्थापक, संचालक, तज्ञ, कलावान, शिल्पकार आदि आदि सर्व कांहीं महासरस्वती स्वरूपच आहे. आणि जगदंबेचें सर्वांत लहान पण प्रियतम असें हें महासरस्वती स्वरूपच अखिल विश्वांतर्गत कृतिगतींना स्थित व स्थिर करून त्यांना सौंदर्य व स्थैर्य देत असतें. ज्या वेळेस तिला या विश्वांत रूपांतर करण्याची किंवा त्यांत पुनर्घटना करण्याची इच्छा होते व तदनुरूप ती उद्योग करूं लागते त्यावेळेस तिची प्रत्येक कृति श्रमसाध्य, सूक्ष्माति-सूक्ष्म, घटक, व्यावृत, अति दक्ष, अति सावकाश, चतुःसीमापरिपूरित अशी चालते. मानवी स्वभावाच्या उतावळेपणांत कधीं तर ती आपल्यास रें रें करीत चाललेली, फारच मंदगती व कधींहि न संपणारी अशी भासते. परंतु कांहीं झालें तरी तिची क्रिया अव्याहत चालूच असते. ती एकसूत्री असते. ती व्यंगरहित असते. आपलें कार्यसाधनांत आपण अतंद्रित, अविश्रांत, अविरत व सदा दक्ष असावें ही मुळीं तिची इच्छा होय. आपण चालविलेल्या कामावर योग्य देखरेख ठेवून प्रत्येक बारीक सारीक गोष्टीचें सुद्धां ती सूक्ष्म निरीक्षण करीत असते. एकादें क्षुल्लक सुद्धां वैगुण्य तिच्या नजरेंतून चुकून जात नाहीं. त्यांतील अल्पात्यल्प फटसुद्धां तिला तत्काळ दिसते. यत्किंचितहि कोठें वक्रता आली असेल किंवा कोठें अपूर्णता राहिली असेल तर ती देखील तिला खपत नाहीं. जें जें कार्य तिच्या हातून घडते त्याचा ती योग्य परामर्ष घेते. सर्वांची यथायोग्य तुलना करते. त्यांत योग्य ती सुधारणा व वाढ करते, जें कांहीं करावयाचें उरलें असेल त्याची योग्य समजूत घालून देते. तिच्या दृष्टीनें कोणतीहि बाब क्षुल्लक वा क्षुद्र नाहीं. क्षुद्रांतली क्षुद्र, स्वल्पांतली स्वल्प कां गोष्ट असेना तिकडे अगदीं

बारकाईनें लक्ष देण्यास ती कधींसुद्धां चुकत नाहीं. कितीहि गुप्त, अंतर्हित, गहन, अव्यक्त, गूढ, प्रच्छन्न व वेषांतरित बाब असली तरी ती तिच्या स्वकार्यपर–दक्ष नजरेतून सुटत नाहीं. तिची चौकस व चाणाक्ष दृष्टी त्याला तात्काळ हुडकून काढते व त्याचा योग्य प्रबंध करते; त्याशिवाय तिला स्वस्थताच वाटत नाहीं. अंगप्रत्यंगाची इष्ट घडामोड करीत ती त्याला ईप्सित रूप देते व अखिल विश्वचक्रांतील त्याच्या नियत स्थानावर त्याला अधिष्ठित करून त्याजकरवीं नियोजित कार्य निश्चितपणें घडवून आणते. हा तिचा क्रम सतत चालूच असतो; त्यांत खळ पडतच नाहीं. ही घडामोड करतांना वस्तूंची संघटना, विघटना पुनर्घटना करण्यांत एकंदर विविध आवश्यकतांवर, त्या पूर्ण करण्याच्या अनेक प्रकारांवर व नानाविध उपायांवर तिची कुशाग्र दृष्टि एकसमयावच्छेदेंकरून सारखी फिरत असते, व त्यांची तारतम्य-भावानें व्यवस्था लागण्यांत ती सदैव गर्क असते. त्याप्रीत्यर्थ कोणत्या वस्तूची केव्हां, कोठें, कशी व किती प्रमाणांत योजना करावयाची, कोणती वस्तु उपयोगांत आणावयाची, कोणती निरुपयोगीं म्हणून दूर सारावयाची याचें तिला स्वभावासिद्ध ज्ञान असतें, त्यामुळें योग्य वस्तूचा योग्य कालीं, योग्य स्थळीं, योग्य प्रकारें, योग्य परिस्थितींत व योग्य अवस्थेंत न चुकतां उपयोग करून आपलें नियोजित व ईप्सित कार्य निश्चितपणें यशस्वितेनें पार पाडते. हयगय, अदक्षता, दुर्लक्ष, आळस यांचा तिला मनापासून तिटकारा आहे. कसेंतरी, ओबडधोबड घाईघाईनें, अव्यवस्थितपणें केलेलें काम, कामांत केलेली कुचराई, असावधानता, अपूर्णता, अलक्ष्यसाधन, काम करण्याच्या साधनांचा व हत्यारांचा दुरुपयोग, भलताच उपयोग, अनुपयोग व अपयोग करणें, तसेंच त्यांना बोजडपणें, नवशिक्याप्रमाणें बुजल्यासारखें, भलत्याला भलत्याच कामीं व प्रसंगीं वापरणें, काम करण्याच्या बुद्धीचा

कौशल्याचा, व सामर्थ्याचा मिथ्या उपयोग करणें, चोरून उपयोग करणें, मुळींच उपयोग न करणें, किंवा उपयोगांत अंगचोरपणा करणें, अपूर्ण उपयोग करणें, अनियमित उपयोग करणें, हातीं घेतलेलें काम अपुरेंच सोडणें, नेमून दिलेलें काम चुकविणें, पत्करलेलें काम न करणें, नियत काम करण्याचें टाळणें, विहित कामांत अळंटळं करणें हें तिच्या स्वभावाला मुळीं सुद्धां खपत नाहीं. त्याचा तिला कंटाळाच नाहीं तर त्वेष येतो. त्या विषयीं तिची वृत्ति तिरस्कारपूर्ण असते. तिला त्याची अत्यंत चीड येते. तिनें केलेलें किंवा घडवून आणलेलें काम पाहिलें म्हणजे त्यांत सर्वत्र व्यवस्थितता, संपूर्णता व शोभनीयताच दिसून येते. एक सुद्धां गोष्ट क्षुद्रातिक्षुद्र देखील विसरून राहिलेली किंवा भलत्याच स्थळीं उपयोजिलेली अथवा टाळाटाळ बुद्धीनें सोडून दिलेली आढळत नाहीं. सर्व कसें सुघटित, संपूर्ण प्रमाणबद्ध, सुंदर, टाकठीक असून अगदीं सहज डोळ्यांत भरते. त्यांतील सौंदर्य, सौकर्य, प्रामाण्य, व्यवस्था व घटनाचातुर्य आश्चर्यकारी, मनोहारी, आदर्शभूत व आदरणीय असतें. परिपूर्ण संपूर्णतेमध्यें रतिमात्र वैगुण्य अथवा उणीव तिला खपत नाहीं. जें कांहीं करावयाचें तें यथासांग, यथापूर्ण यथास्थित व यथाभाव करावयाचें; मग त्याला वाटेल तितका काळ लागो. अनंत युगें लोटलीं तरी त्याची ती चिंता करीत नाहीं. आपलें काम यथेप्सित रीतीनें सर्वांगसुंदर, सर्वांगपरिपूर्ण केल्याशिवाय तिला बरेंच वाटत नाहीं. या तिच्या अभिजात स्वभावामुळें मनुष्यप्राण्यांच्या व मानवजातींच्या अपरिमित वैगुण्यांच्या संबंधांत जगदंबेच्या चतुर्विध स्वरूप मूर्तींपैकीं महासरस्वतीच अधिक सहिष्णु असते. तिची सहनशीलता अगाध आहे. मनुष्याचे दोष तिला कळतात तरी त्याबद्दल ती विषाद धरीत नाहीं, किंवा त्याला झिडकारीत नाहीं, त्याचें पारिपत्य करीत नाहीं. किंवा त्याचा त्याग पण करीत नाहीं. उलट मनुष्य

आपल्या प्रयत्नांत एकनिष्ठ राहिला, निष्कपट भावानें आपल्या उद्योगास लागला, मनापासून त्यांत लक्ष देऊं लागला, तर ती हसत-मुखानें व वत्सलतेनें त्याला आपल्याजवळ बसवून, आपल्या हाती त्याचा हात धरून त्याच्याकडून काम करविते. नियुक्त कामापासून परावृत्त होणें, त्या संबंधांत अनुत्साही होणें, किंवा त्याविषयीं उदासीन राहणें तिला ठाऊकच नसतें. मनुष्याच्या हातून पुनःपुनः चुका झाल्या तरी ती कधीं देखील पराङ्मुख होत नाहीं. त्याच्याकडून पुनःपुनः आग्रहपूर्वक प्रयत्न करवीतच असते. परंतु द्विधाभाव, निष्ठाहीनता, छलबुद्धी हीं मात्र तिला मुळींच सहन होत नाहीं. आत्मवंचना, दंभ, वृथाभिनिवेश, कपटनाटक यांचा ती अगदीं निष्ठुरपणें व्यंगपूर्ण परिस्फोट करण्यास कधींहि मागेंपुढें पहात नाहीं. एकाद्या मातेप्रमाणें आपल्या गरजा पुरविणारी, एकाद्या मित्राप्रमाणें संकटकाली आपणांस हात देणारी, शांत चित्तानें आपणांस सतत उपदेश करणारी, शाश्वत आनंदाचें सदा सर्वदा दिग्दर्शन करविणारी, ध्येयच्युती पासून आपलें रक्षण करणारी, विवेकपूर्ण सुविचार सांगणारी, मनस्ताप, विषाद व खेद यांना स्वतःच्या सोज्वल मधुर हास्यानें पार हाकून लावणारी, सदासांनिध साह्याची वारंवार आठवण देणारी व धीरगंभीरतेनें सारखी प्रोत्साहन देणारी अशी ही देवता आपणांस आपल्या उच्चतम उद्दिष्टाकडे प्रचोदित करते व या अखिल विश्वाच्या सृष्टि सौंदर्यांत आपला नियत कार्यभाग यथासांग, यथापूर्ण करण्यास साह्यभूत होते; अत्यंत चिकाटीनें, नेटानें व अविचलतेनें आपल्याला सारखी पुढें रेंटीत असते. इतर सर्व देवतांना आपआपल्या कार्यांच्या परि-पूर्ततेसाठीं तिचाच आसरा मागावा लागतो. कारण त्या साऱ्या कार्यांचा जडचैतन्य पूर्ण आधिभौतिक पाया घालणारी तीच. त्यांतील विविध व विभिन्न आंगोपांगाची यथोचित व्यवस्था, योजना, रचना

ध घटना करणारी पण तीच. आणि एकंदर कार्यांची इमारत उभी झाली म्हणजे तिला ठिकठिकाणीं आंवळून बांधणारी, ठाकून ठोकून नीटस करणारी सर्व प्रकारें तिला सुरक्षित, टिकाऊ, मजबूत व सुंदर करणारी देखील तीच. तिच्या साह्याशिवाय इतर देवतांचें कार्य कधीं सुद्धां सर्वांगशुद्ध, सर्वांगसुंदर व सर्वांगपूर्ण होणार नाहीं. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे माहेश्वरी, महाकाली व महालक्ष्मी यांच्या कार्यांची सुबकता, सुंदरता, सुघटितता सारें कांहीं महासरस्वतीच्या अविश्रांत, अचुक, कार्यदक्षतेचाच सुपरिणाम होय.

२ या चतुर्विध प्रमुख अवताराशिवाय जगन्मातेचे आणखी किती तरी विविध अवतार आहेत. परंतु ते बहुतेक दुःसाध्य व दुराराध्य असल्यामुळें ऐहिक मानवी जीवनांत त्याचें विशेष आवाहन, आराधन व अधिष्ठान झालेलें दिसून येत नाहीं इतकेंच नव्हें तर इहलोकीं त्यांची विशेष ख्याति पण ऐकूं येत नाहीं. या मृत्युभूमीच्या उत्क्रांतींत त्यांना प्रामुख्यानें पुढें केलेलें किंवा त्यांच्या कडे कांहीं विशेष महत्वाचा कार्यभाग सोपविलेला हि आढळत नाहीं. तरीपण मनांतील साक्षात्कारापीत्यर्थ त्यांतील कितीतरी रूपें अत्यावश्यक आहेत साक्षात्काराची अपेक्षा असेल तर त्यांचे आराधन कठिण तर खरेंच पण केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. आणि त्या सर्वांत अति प्रधान व सर्व प्रमुख असें जें तिचें परमानंदस्वरूप तें तर अवश्यमेवच आराधनीय होय. अनिर्वचनीय प्रेमस्वरूप परमेश्वराच्या दिव्य प्रेमोद्भूत रहस्यमय प्रबल हर्षोन्मादाचा तो आनंद; जडस्पर्शीस्थूलत्वाच्या अधस्तमगर्तावस्थेशीं मनातीत सूक्ष्मत्वाच्या उच्चतम स्थितीशीं सहज-संयोग करून देणारा तो आनंद; जड चैतन्य, स्थूलसूक्ष्म दोन्ही एकाच परमतत्वाचीं दोन विभिन्न टोकें आहेत याचा आत्मानुभव करविणारी तो आनंद; आपल्या “ निहितं गुहायां ” अशा गूढतम स्थानांतून

सुद्धां विश्वांतःस्थित तदितर नानाविध शक्तींच्या कार्यांचा एकमात्र म्हणून स्वतःचा परिचय प्रत्यक्ष प्रत्ययानें करून देणारा तो आनंद; त्या सर्वातीत, सर्वोच्च, सर्वव्यापी, सर्वांतर्हित, सर्वसाक्षी, सर्वशक्ति दिव्यतम परमानंदाचें हें रूप जगन्मातेच्या उपरिनिर्दिष्ट चतुर्विध रूपांव्यतिरिक्त अति प्रथम, अतिप्रधान व अति प्रमुख असें आराधनीय स्वरूप होय. परंतु या परमानंद स्वरूप प्रभृति मातेचीं जीं बहुविध रूपें आहेत त्यांचें आवाहन करणें, त्यांची आराधना करणें, त्यांची उपासना करणें, त्यांना अंतर्यामीं अधिष्ठित करणें, किंबहुना त्यांच्या सहज दिव्य, सतेज, सवेग कार्यावेगाला सहन करणें हें मानवी सामर्थ्याच्या पलीकडे आहे. मनुष्य स्वभावतःच मर्यादित, संकोचित, स्वयंमन्य, अहंकारी, स्वार्थी, अज्ञ, अश्रद्ध, संशयात्मा, असल्यानें त्या दिव्य स्वरूपांच्या आविष्कारांचें आधानपात्र होण्यास तो अपात्र ठरतो. आणि मारून मुटकून अंगीं पात्रता आणण्याचा त्यांनीं प्रयत्न केला तरी त्या दिव्याधिष्ठानाचें तेज त्याला दुःसह होतें. त्याचा अपार भार त्यास झेंपत नाहीं, म्हणून त्या भानगडींत प्रथम न पडतां मनुष्य-मात्रानें सुरवातीस या सहजाराध्य, सुसाध्य व प्रसन्नसुलभ चारही देवतांचें यथासांग आवाहन करून त्यांची योग्य आराधना करून, त्यांना स्वांतर्यामीं स्थिराधिष्ठित करावें, व त्यांच्या प्रेरणेच्या आधीन होऊन आपलें सारें जीवन, तन मन धन सर्व कांहीं त्यांच्या चरणीं वहावें व त्यांच्या हातीं सारा कारभार सोंपावा, त्याच्या एकसूत्री व सर्वतंत्री कार्य प्रणालींचें परिणत कार्यक्षम साधन बनावें. असें झालें म्हणजे मग त्या तदितर अन्यस्वरूपांचें या ऐहिक जीवनचर्येत कोठें कोठें कधीं कधीं दिग्दर्शन होण्याचा सुयोग येतो व त्या सौभाग्य-प्रसंगींच काय ती मनातीत कृति करतां येते. कारण त्या समयीं तिचीं ही मनातीत विविध रूपें व्यक्त होतात. मनुष्यास कार्यक्षम करतात

व परिणत कार्य झाल्यानंतर तिच्या मध्येंच पुनर्विलीन होतात. तशा वेळीं तीं बहुविध परिणत कार्यें आपली विविधता सोडून तिच्या एकसूत्री व सर्वतंत्री आदेशानुसार एकवटतात व एकरूप होतात; आणि त्या वेळीं हीं स्वरूपें तिच्यापासून उद्भवून तिच्यांतच अंतर्धान पावतात व तिच्या सर्व शक्तिसंपन्नतेचा, तिच्या सर्वाधिमातृत्वाचा परिचय देतात. त्या वेळी ती सर्व मनातीत देवतास्वरूपें जगन्मातेच्या दिव्य तेजोमय अवस्थेंत अंतर्भूत होतात; आणि त्याच वेळीं खरोखर जगदंबेचें महदानंदकारी, अचिंत्य महाशक्तिस्वरूप विश्वविराटरूप वस्तुतः दिग्दर्शित होतें व आपल्या अनिर्वचनीय ज्योतिर्मयी प्रभा-मंडळांतून सुदिव्य दैदिप्यमान, तेजःपुंज किरणांची सर्वत्र सारखी फेंक करीत असलेली दिसते आणि त्या किरणांच्या योगें अखिल विश्व-विश्वांतरांना प्रकाशित, प्रमुदित व सुप्रसन्न करित्ये. मग मात्र हा मर्त्य मानवी स्वभावधर्म त्या सर्वसंचालक दिव्य स्वभाव धर्माशीं एकरस होतो किंबहुना त्यांतच परिवर्तित होतो. कारण त्याच वेळीं काय तें खरें ‘ मनसः परं ’ असें सत्य ज्ञान व सत्य शक्ति यांची संगति लागते व त्यांच्या अगदी मौलिक तारा सुद्धां एकतात्मी होऊन सुस्वर संगीत गाऊं लागतात, आणि मानवी जीवनाची सारंगी विश्वाच्या अनंतस्वरी सुमधुर संगीतांशीं समस्वर होऊन त्याच्या गीताचे आलाप काढूं लागते.

३ जर तुह्माला या सुस्वर संगीताचा नाद कानीं पडावा अशी इच्छा असेल, जर आपल्या जीविताची सारंगी अशीच विश्वगीताचें मधुरालाप काढणारी व्हावी असें तुम्हास वाटत असेल तर तुह्मी आपल्याला स्वतःला अनन्यभावें जगदंबेच्या चरणी वाहून घ्या; तुमची सर्व जीवनसूत्रें निःशंकपणें व निष्कपटानें तिच्या हातीं सोंपवा; तिच्या कार्यप्रेरक शक्तीच्या पूर्ण आधीन व्हा; व्यर्थ शंकेकुशंकेला, कुत्सित

कल्पनेला, स्वार्थपर बुद्धीला तिळमात्रही ठाव देऊं नका. अहंतेला, प्रतिकार वृत्तीला लेशमात्र अवकाश देऊं नका. निमिषमात्रसुद्धां मन विचलित होऊं देऊं नका. त्यांत काडीचीसुद्धां विकृति येऊं देऊं नका; त्याला रेंसभरहि विचारांतरित होऊं देऊं नका. मातेला जें कांहीं कार्य तुमच्या हस्तें साधावेसें वाटत असेल तें तिला अप्रतिहतपणें, निर्विघ्न-रीतीनें, निर्धास्त साधूं द्या. त्यांत तिला कोठेंहि, कसलाहि, केव्हांहि, रतिमात्रसुद्धा प्रत्यवाय न वाटावा अशी तुम्ही आपली मनोभूमिका तयार करा. त्यासाठीं तुह्माला तीन गोष्टी साध्य करून घेतल्या पाहिजेत. एक संवेदनाक्षमता, दुसरी सुखनम्यता व तिसरी आत्मार्पण-बुद्धि. तुह्माला संवेदना सामर्थ्य पाहिजे. संवेदनाशीलता तुमच्या मनींमानसीं, हृदयांत, बाह्याभ्यंतरी, अंतर्यामीं, शरीरांत, चित्तांत, जीवितांत, अंगप्रत्यंगांत, रोमरोमांत सर्वत्र सारखी खेळली पाहिजे, बाणली पाहिजे, भिनली पाहिजे. त्यायोगें तुह्माला मातेच्या अधिष्ठानाची, तिच्या कार्यसामर्थ्याची, तुमच्या द्वारें तिनें चालविलेल्या कार्यांची संवेदनापूर्ण जाणीव तुम्हाला असली पाहिजे. कारण तुमच्या संशयग्रस्त, अज्ञानावलिप्त, अश्रद्धपूर्ण, जीवनांतसुद्धां तिला तुमच्या-कडून काम करवून घेतां येतें व ती त्याप्रमाणें करवून घेत पण असतें; मात्र तुम्हाला त्याची जाणीव नसते इतकेंच. तुमच्या प्रत्येक जडांध कृति गति मधूनच ती आपलें कार्य तुमच्या द्वारें सारखें सिद्धीस नेत असतें. तरीपण तिच्या त्या कार्यांची तुह्मांस जाणीव असण्यांत, तिच्या कार्याशी सदा जागृत व सदा जीवंत चैतन्यमय समवेदनेंत जें स्वारस्य आहे तें कांहीं औरच होय. दोन्ही अवस्थांमध्यें जगदंबेचें कार्य होतच असतें. त्यांत कांहीं खंड पडत नाहीं. परंतु दोघांमध्यें जमीन अस्मानाचें अंतर आहे ह्मणूनच तुम्हाला ती जाणीव, ती संवेदनाशील चिच्छक्ति, ती समवेदनाक्षमता साध्य करून घेतली पाहिजे.

४ तसेंच तुमचें सारें जीवन, तुमची सारी प्रकृति तुमचा सारा स्वभावधर्म, तिच्या दिव्य हस्तस्पर्शाला सदा संवादी, व सहज सुखनम्य अशीं झालीं पाहिजेत. एखाद्या अज्ञ, अश्रद्ध, संशयात्मा पुरुषाप्रमाणें तिच्या कार्याविषयी तर्ककुतर्क लढवीत बसणें, किंवा नसत्माच शंका काढीत बसणें, किंवा विपर्यास करीत रहाणें, किंवा कुत्सित बुद्धीनें चिकित्सा करणें हें सारें तुम्ही सर्वथैव सोडून दिलें पाहिजे. नाहींतर आपल्याच हातानें आपल्याच पायावर धोंडा मारून घेतल्यासारखें होऊन स्वतःच्या उन्नतीच्या व प्रगतीच्या मार्गांत वळेंच विघ्न उपस्थित करण्याचें मात्र श्रेय पदरीं पडावयाचें. मूर्ख मनुष्य आपल्या आढ्यतेंतच गर्क राहून दुराग्रहपूर्वक प्रत्येक दिव्य स्फूर्तीला विरोध करीत सर्वार्थांना विपरीत करतो; आपल्याच स्वैर स्वेच्छतेचें घोडें पुढें ढकलतो, व अखेरीस आपल्या कुवासनेला बळी पडतो व त्याचे दुष्परिणाम भोगीत रडत बसतो; तद्वतच आपली गति न होण्याची पुरेपूर सावधानता सर्वदा ठेविली पाहिजे. कोणत्याहि प्रकारच्या हटवादीपणाला किंवा आग्रहीवृत्तीला अणुमात्रदेखील अवकाश देतां कामा नये. मनुष्याची अहंतापूर्ण बुद्धि आपल्या अयोग्यतेच्या, जड तत्वाच्या व तमोवृत्तींच्या भिंतीआड लपून बसून दैवी स्फूर्तींवर गोळ्या झाडते व ईश्वरी कार्याला अडथळा करण्याचा व्यर्थ खटाटोप करण्याचे भरीस पडते. तदनुसार अहंकृत भावनाधीन होऊन आपल्या हातून कांहीं न होण्याची चिंता सदा सर्वदा चित्तांत वाहिली पाहिजे. तमो बुद्धीला वशीभूत होऊन मनुष्यप्राणी ऐहिक विषयोपभोगांतच मग्न होतो. त्या क्षुद्र, क्षणभंगुर, अंधःकारपूर्ण अधोगती प्रत नेणाऱ्या विलासांत लोळत रहातो. आपल्या दैनिक विलासलीलांत दंग राहून आपल्या निर्माल्यवत् जीवनांत, आलस्य निद्रेंत, जडमय तंद्रींत कशाहि प्रकारें खंड पडल्यास किंवा त्याचा भंग झाल्यास व्यर्थ आक्रोश करूं लागतो, तडफतो, हातपाय झाडूं लागतो. तसा हास्यास्पद

प्रकार आपला देखील न होईल या विषयीं सदैव सावध असलें पाहिजे. आपल्या एकंदर बाह्याभ्यंतर जीवनांचीं सूत्रें बिनशर्त, निरव-शेषतया, सर्वस्वार्पण भावानें जगन्मातेच्या हातीं देण्यानेंच आपल्या अंगोपांगांत अवश्य ती सुखनम्यता व सहजसंवादिता बाणेल; अन्यथा नाहीं.

५ या सहजसंवादिता व सुखनम्यते प्रमाणेंच आपली परिपूर्ण आत्मार्पण वृत्ति ही सर्व प्रकारें जागृत व निष्कपट अशींच आपण ठेविली पाहिजे. त्या योगेंच इहत्र होणाऱ्या परमोच्च तत्वाधिसंपन्न परमेश्वरी वृष्टींतील सर्वज्ञता, ज्योतिष्मता, समर्थता, स्वैरकता, सुंदरता, एकतालता, प्रमाणबद्धता व संपूर्णता यांचा स्वाद आपणास चाखतां येतो. आपल्या जाणीवेनें, संवेदनाशीलतेनें, सुखनम्यतेनें, आत्मार्पणानें आपण आपलें हृत्कमल मातेप्रीत्यर्थ कोमल आसन म्हणून सदा विकसित, प्रफुल्ल सुशोभित व प्रसन्न ठेविलें व तेथें तिचें विनयपूर्वक आवाहन आणि श्रद्धापूर्वक अधिष्ठान करविलें व मनःपूर्वक तिची आराधना चालविली म्हणजे मगच त्या अनुपम आल्हादकारी आस्वाद आमोदाचे आपण अधिकारी होतो. फार काय पण दैवी शक्तीच्या आघाताला सदा जडवत् प्रत्याघात करणारे हें आपलें मर्त्य शरीर सुद्धां त्या दैवी प्रमोदानें आनंदित होऊन चैतन्यमय होतें; व त्या अनिर्वचनीय दिव्य कार्य प्रेरणेशीं सुसंगत होऊन तादात्म्य भावनेंत तल्लीन होतें आणि पुढें मागें, वर खालीं, चाऱ्ही बाजूंनीं, दहा दिशांनीं त्या परमेश्वरी आनंदसामर्थ्यानें प्रोत्साहित व प्रमोदित होऊन कार्यक्षम व कार्य–प्रवृत्त होतें. मग मनुष्य त्या अनिर्वचनीय प्रेमस्वरूपाच्या प्रेमोदधींत स्नान करील व तेथील आनंदोर्मींवर खेळत बागडत राहील व त्या आनंदाच्या लहरींबरोबर नाचूं लगेल. सारांश, सहजसंवादिता, सुलभ सुखनम्यता व निर्विशेष स्वार्पणवृत्ति या तीन साधनांच्या द्वारेंच मनुष्याला परमानंद प्राप्तीच्या योग्य होतां येईल. अन्वथा नव्हे.

९

**परंतु** त्यासाठीं सदा सावध राहिलें पाहिजे. दक्ष रहा. आपल्या क्षुद्र मनोवृत्तींच्या तराजूंत मातेच्या कार्यांचें तोल करण्याच्या भानगडीत पडूं नका. आपल्या अज्ञानांध अहंमन्यतेनें मातेची कृति अजमावण्याची खटपट करूं नका. मानवी मनाचा हा प्रकृतिधर्मच आहे कीं तें स्वतःच्या आकलनशक्तीच्या पलीकडील अतींद्रिय विषयांच्या विवेचनांत रस घेतें; आपल्या ज्ञानमापन व अनुमापन साधनांचे जोरावर अप्रमेय, अतुलनीय विषयांची मोजदाद करण्यांत व तोलमाप काढण्यांत दंग राहतें. आपल्या मर्यादित बुद्धिसामर्थ्याच्या साह्यानें

बुद्धिगम्य नसलेल्या विषयांची चर्चा करण्यांत गुंग होतें. अनुमान, तर्क, युक्तिवाद, प्रमाणपद्धति आदि लढवून भ्रमाचे भरांत अज्ञेय विषयांचे सिद्धांत प्रस्थापित करण्याच्या खटाटोपांत पडतें. सारांश तें मानवी मन आपल्या क्षुद्र आत्मानुभवजन्य ज्ञानाच्या घमेंडींत, आपल्या अगाध अज्ञानाच्या दुराग्रहांत, आपल्या स्वार्थपर बुद्धीच्या पोकळ भ्रमांत चक्कर खात राहतें, व पुष्कळ वेळां सत्य ज्ञानाला, दैवी स्फूर्तीला, जगदंबेच्या कार्यप्रेरणेला विमुख होते. दैवी संदेशाला बहिरें होतें. दिव्य प्रवृत्तीला पराङ्मुख होतें. म्हणून या त्याच्या स्वाभाविक वृत्तीसंबंधांत फारफार जपून वागलें पाहिजे. त्याबद्दल घेऊं तितकी काळजी व खबरदारी थोडीच होईल. दैवी शक्तीनें प्रेरित कार्याच्या विविध व विभिन्न प्रणालींना, श्रेणींना, प्रवृत्तींना व स्वैरगतींना अर्धोन्मीलित दशेंत असलेलें, अज्ञानांध व ज्ञानाहंतेनें विमूढ मन समजूं शकत नाहीं, उमजूं शकत नाहीं; मग त्यांचें यथार्थ आकलन करण्याची गोष्टच कशाला; त्या ईश्वरी शक्तीच्या दृष्टिपाताची सवेगता, विविधता, तीव्रता व दिव्यता, तिच्या कृतिचमत्काराची अभिनवता, सर्वव्यापकता व शीघ्रपरिणतता त्या क्षुद्र मानवी मनाच्या ग्रहण व आकलन शक्तिबाह्य आहेत. त्यांची प्रचंड, सवेग, सुशीघ्र गति व या अल्पज्ञ मनाची दुर्बल, स्थूल व मंदगति म्हणजे सूर्याचा सतमुखी अश्व व आपल्याच पाठीवरील घरट्यांत गुरफटलेली गोगलगायच होय ? म्हणतातच की कोठें इंद्राचा ऐरावत आणि कोठें शाम-भटाची तट्टाणी !!

२ जगदंबेची व्यक्तिभूत स्वरूपविविधता, त्यांत क्षणोक्षणीं होणारीं चमत्कृतिपूर्ण रूपांतरें, आज एक सूर तर उद्यां दुसराच सूर याप्रमाणें सारखी चाललेली आलापबहुविधता, आतां विलंबित तर लगेच द्रुत अशा लयीनें घेतलेल्या मधुर तानांचें संमिश्रण, वेगाची

वृद्धि व गतीचें निरोधन या घटकेला असें तर दुसऱ्या घटकेला तसें अशाप्रकारें सतत चालू असलेलें कार्यपरिवर्तन, एक प्रश्न सोडविण्याची आज एक रीति तर उदईक तसाच दुसरा प्रश्न उलगडण्याची तऱ्हा अगदींच वेगळी, आतां एकसूत्र हालविलें तर थोड्याच वेळांत दुसरें हातीं धरलें तर आणखी अर्ध्या घटकेनें सगळ्याच सूत्रांना एकदम एकवटून हालविलें इत्यादि विलक्षण कुतुहलोत्पादक परिस्थितीनें मनुष्य पार भांबावून जातो. आणि तसा गांगरला म्हणजे मग आपल्याच अज्ञानाच्या भोंवऱ्यांत फसून दैवी आकाशांतील तेजोमय ज्ञानाला गवसणी घालण्यासाठीं व्यर्थ बाता मारतो. त्याला जगन्मातेच्या दिव्य शक्तीचें ज्ञान होत नाहीं. परिचय मिळत नाहीं. प्रत्यय येत नाहीं. स्वतःचें भान उरत नाहीं. कशावरहि विश्वास बसत नाहीं, श्रद्धा रहात नाहीं, आपल्याच संशयांत गुरफटलेला रहातो. म्हणून सावध होऊन आपलें अंतःकरण शुद्ध, स्वच्छ, पवित्र व पुनीत करून तेथें श्रीजगदंबेचें आवाहन करावें. तिच्या अधिष्ठानाची तयारी ठेवावी, निर्विकल्प स्वार्पणानें, अत्यंत सूक्ष्म व तीव्र संवेदनक्षमतेनें आणि सहज सरल सुखनम्यतेनें तिच्या आगमनाची मार्गप्रतीक्षा करावी. तिच्या आराधनेंत मग्न राहून आपल्या आत्म्याच्या ठायीं लीन होऊन अध्यात्मिक भावनेनें आत्यंतिक श्रद्धेनें तिची उपासना चालवून तिच्या सांनिध्याची जाणीव करून घ्यावी. अध्यात्मिक दृष्टीनें तिच्या साक्षात्काराचा अनुभवानंद चाखावा आणि अध्यात्मिक वृत्तीनें तिच्या चरणीं नम्र व्हावें, तन्मयतेनें तल्लीनतेनें तिची करुणा भाकावी तेव्हांच सत्याचा तेजःपुंज प्रकाश आपल्या हृदयांतरीं उदय पावेल व ज्योतिर्मय सत्यस्वरूपाचें दर्शन घडेल. मग श्रीजगदंबा स्वतः प्रत्यक्ष होऊन तुमच्या मनाचीं, बुद्धीचीं, अंतःकरणाची, आत्म्याचीं, फार तर काय पण तुमच्या या जड देहाचीं सुद्धां सारीं भ्रमपटलें व तमोमय आवरणें

दूर सारून त्यांच्या अभ्यंतर्गत विमल दैवी संपत् तत्वांचें आविष्करण करील व त्या द्वारानें स्वतःच्या दिव्यकार्यांच्या, योजनाचातुर्याचा, रचनाकौशल्याचा व व्यवस्थासौंदर्याचा परिचय करवील; आणि तुम्हाला त्यांतील निगूढ रहस्य उकलून दाखवून परमानंदाच्या शिखरावर नेऊन पोहोंचवील.

३ आह्मा मानवी जीवांच्या वरवरच्या तुटपुंज्या ज्ञानानें व अल्पस्वल्प, अपक्क त्रोटक अनुभवानें त्या परमेश्वरीच्या सर्वज्ञतेसंबंधीं व सर्वशक्तिमत्तेसंबंधीं कांहीं भ्रामक व मिथ्या कल्पना झालेल्या असतात. त्यांच्या योगें आपण त्याच धोरणानें दैवीशक्तीच्या साह्याची अपेक्षा करतो, त्या साठीं तोंड वेंगाडतों. पण ही आपली केवळ मूर्खता व मूढता होय. ह्मणून त्या पासून देखील आपण दूरच राहिलें पाहिजे. मानवी मनाला सहजोपलब्ध कीर्ति व नेत्रांना दिपवून सोडणारी वैभवसंपन्नता, आणि अलौकिक चमत्कृतिसमर्थता यांतच मौज वाटते आणि तशी अपेक्षा ठेवून तें त्या प्रीत्यर्थ आक्रंदन करीत रहातें. त्याच्या अभावीं त्याला दैवीशक्तिसंचाराचा आभासच होत नाहीं. त्याविना त्याला लोकविलक्षण सामर्थ्य अंगीं बाणलेंसें वाटतच नाहीं, त्याला काय करावयाचें? पण श्री जगदंबेच्या प्रसादामृताचा आस्वाद घेण्याची इच्छा ठेवणारानें मात्र त्या व्यर्थ भ्रमांत कधीं सुद्धां पडूं नये. श्री जगदंबा या अज्ञानतिमिरावृत कर्मभूमींतच अवतीर्ण होऊन त्या तिमिराला दूर सारण्याचें कार्य साधीत असतें. आपल्या दिव्य ज्ञानज्योतीनें ती त्या गाढ अज्ञानतमाला लयास नेत असते. आपल्या ईश्वरीय सामर्थ्यानें ती त्या मानवी दुर्बलतेचा खरपूस समाचार घेते. त्यासाठीं ती ह्या कर्मभूमीत येते. येथें वास करिते व आपला कार्यभाग तडीस नेते. आपल्या सर्वोच्च लोकांत स्वस्थ पडून राहून तेथूनच उंटावरून शेळ्या हांकणाऱ्याप्रमाणें ती आपला हा सृष्टिस्थिति-

लय कार्योद्योग चालवीत नाहीं. कधीं प्रत्यक्ष अवतार घेऊन ही आपल्या दिव्य ज्ञानाला व दैवी सामर्थ्याला व्यक्त करते, तर कधीं त्यांवर पडदा टाकून त्यांना अगोचर करून ठेवते. आपलें कार्य–साधक ह्मणून ज्यांची ती निवड करते, ज्यांच्या मध्यें स्वयं अधिष्ठित होते, ज्यांच्या मध्यें अंतर्निविष्ट होऊन कार्य संचालन करविते, त्या आपल्या श्रद्धाळू भक्तांपासून, त्या आपल्या परमोपासक विभूतीपासून सुद्धां कधीं कधीं ती आपली प्रज्ञाशक्ति व बलसंपदा लपवून ठेवते आणि त्यांना केवल कार्यप्रेरणा देऊन कार्यप्रवृत्त करते. त्यांच्या जिज्ञासू मनाला, त्यांच्या मोक्षाभिलाषी आत्म्याला मुक्तिप्रीत्यर्थ धडपडणाऱ्या चैतन्याला या जडबद्ध सदाकष्टी शरीराला योग्य वळण लावण्यासाठीं त्यांच्या मागें मागें चोरट्या पावलानें हिंडत फिरते. स्वतः अज्ञातवासांत राहून कधीं त्यांना हात देऊन, तर कधीं धीर देऊन तर कधीं प्रोत्साहित करून, तर कधीं त्यांना मार्ग दाखवून त्यांचें संरक्षण व संगोपन करीत त्यांच्या हातून आपली नियोजित इष्टकार्यसिद्धि घडवून आणते. परमेश्वरी इच्छेनें परिस्थित्यनुरूप कित्येक अवस्था निर्माण झालेल्या असतात. त्यांत किती तरी गुंतागुंत असते. आणि तो सारा गुंतावळा नीट उलगडावयाचा असतो. घेतली तलवार, घातला घाव, केले दोन तुकडे आणि झाली सुटका असें करून चालत नाहीं. या ऐहिक कर्मभूमीमध्यें कितीतरि असुर, राक्षस, दैत्य, दानव आसुरी संपदेनें विभूषित होऊन सत्ता गाजवीत आहेत. त्यांचा प्रतिकार करावयाचा, त्यांच्या राज्यांत त्यांना गांठून त्यांना हतविक्रम करावयाचें, त्यांच्याच शस्त्रास्त्रांनीं त्यांचाच पडाव करावयाचा हें कांहीं लहानसहान कार्य नव्हें. त्यासाठीं मानवी देहाला, मानवी मनाला, मानवी आत्म्याला तयार करावयाचें. हें कार्यसुद्धां तितकेंच किंबहुना अधिक दुर्घट होय. त्या प्रीत्यर्थ त्या जीवात्म्याला मनुष्यातीत देहाचें ज्ञान द्यावयाचें,

त्यावर श्रद्धा बसवावयाची, त्याचा परिचय करवावयाचा, त्याचा प्रत्यय आणून द्यावयाचा, आणि अनुभव घ्यावयास लावावयाचें; आणि हें सारें एकदम करूं ह्मणूं तर हा मर्त्य देह इतका क्षणभंगुर, दुर्बल, अज्ञानाभिभूत, ठिसूळ व भ्याड आहे कीं जरासा जोर लावावयाचा अवकाश, तटकन् तुटून पडावयाचा व साराच बाजार आटपावयाचा! अशा परिस्थितींत त्या मानवाला अभिजात, अभिज्ञ, दैवीसंपदाधिष्ठित, प्रतिकारक्षम, सत्तासमर्थ करावयासाठीं त्याला न कळत, त्याच्यावर विशेष दडपण पडणार नाहीं अशा बेतानेंच, यथावकाश घडवून आणावें लागतें. मानवी जीवनाच्या सामान्य मर्यादा ओलांडून तदतीत अवस्थेंमध्यें त्याला एकदम नेऊन ठेवणें शक्यच नाहीं, व तें इष्ट पण नाहीं. ह्मणून त्याच्या ठायीं दैवी शक्तीचा संपातपूर्वक संचार करवून त्याच्या करवीं कार्यसिद्धि घडवून आणण्याचें कार्य दैवी सर्वज्ञता व दैवी कार्यक्षमत यांचें त्याच्या अंतरात्म्यांत आधान करवून श्रीजगदंबा त्याच्या पाठीमागें राहून करवीत असते.

४ ज्या प्रकारचें कार्य ज्या प्रसंगीं करविणें इष्ट, तशा प्रकारचें कार्य त्याजकडून त्याप्रसंगीं करविणें, जी उपाययोजना निश्चित झाली असेल तदनुसार त्याजकडून पावलें टाकविणें, जी कार्यरचना अर्धपूर्ण, अर्धवट दशेंत आहे ती परिणत व परिपूर्ण व्हावी ह्मणून त्याजकडून त्या संबंधांत यथासांग रचना करविणें, हीं सारीं कामें श्री जगदंबेला आपल्या दैवी सर्वज्ञतेच्या व दैवी कार्यक्षमतेच्या आधारानें करावीं लागतात. परंतु जेव्हां आपण आपल्या भक्तिपूर्ण संवेदनशीलतेनें, आपल्या श्रद्धामय सुखनम्यतनें व आपल्या स्वयंस्फूरित, निरवशेष, निष्कपट आत्मार्पणानें जगन्मातेच्या ज्ञान, शक्ति, प्रेम, आनंद स्वरूपाच्या अधिष्ठानास योग्य होतों, तेव्हां तिची मनातीतता आपल्या

अंगीं संचार करते, आणि मग ती स्वतःच प्रत्यक्ष प्रगट होऊन मनातीत शक्तीनें, मनातीत सृष्टिव्यापार आपल्याद्वारें चालविते. पण तेंच जर आपण आपल्या अहंमन्यतेंत आपल्याच मनाचे घोडे नाचवून पाहूं तर मग श्री जगदंबा साक्षात् आपल्या समोर येऊन उभी राहिली तरीसुद्धां तिची ओळख आपणास पटणार नाहीं; मग अर्थातच तिच्या प्रसादाला आपण मुकूं. ह्मणून आपण आपल्या मनाच्या आधीन केव्हांहि होतां कामा नये. आपल्या मनाच्या कह्यांत न जातां, आपला अंतरात्मा अनुच्चारित शब्दानें जें कांहीं सांगण्याचा सारखा प्रयत्न करीत असतो तिकडे सदा सावधान चित्तानें कान दिला पाहिजे. मन हें बहुधा बाह्य स्वरूपालाच सदैव भुलतें, पण आत्मा हा आंतरिक निरीक्षणानें बहुशः सत्यान्वेषी व सत्यदर्शी होत असतो. परमेश्वराचें ठायीं दृढ श्रद्धा असावी, त्याची अनन्यभावें भक्ति करावी, त्याला अनन्यगतिक होऊन शरण जावें, निष्कपटपणें त्याच्या चरणीं आत्म-निवेदन करावें. सर्व कांहीं होणें, जाणें, करणें सवरणें, सारें समूळ आद्योपांत त्याच्यावरच सोंपवावें ह्मणजे तो आपल्यामधील आसुरी वृत्तींना हांकून लावील, दैवी प्रवृत्तींना उत्तेजित करील व दिव्य निसर्गाचें आपणास दर्शन करवील. मग आपणास त्याच्या अमृतमय प्रसादाचीं मधुरानंद फळें खावयास मिळतील व अमरत्वाचा उपभोग घ्यावयास मिळेल.

५ या ऐहिक जीवनाच्या ईश्वरप्रणीत उत्क्रांतियानांत ही मनातीत अवस्थाक्रांति एक सुनिश्चित व अपरिहार्य अशीच पायरी आहे. ऐहिक जीवनांत मन हेंच कांहीं अंतिम ज्ञातव्य खास नाहीं. त्याच्याहि पलीकडे मानव्याचें उत्क्रमण अद्याप व्हावयाचें आहे हें निश्चित होय. त्यांत शंका घेण्याचें कारणच नाहीं; परंतु ती मनातीत उत्क्रांति व्हावी यासाठीं, झाली तर ती व्यक्त व्हावी एतदर्थ आणि व्यक्त झाली तरी

स्थिर व दृढ व्हावी ह्मणून मनुष्यानें या मृत्युभूमींतूनच त्या परमेश्वरीचें, त्या विश्वमातेचें श्रीजगदंबेचें सदा आवाहन करीत राहिलें पाहिजे. ज्यावेळीं तिच्या चिन्मय प्रकाशानें आपला अंतरात्मा ज्योतिर्मय होईल, त्यावेळीं अज्ञानांधतेनें डोळे मिटून किंवा अश्रद्धेनें तो वृथाभास आहे असें कल्पून अथवा संशयात्मक वृत्तीनें त्या संबंधांत उदासीन राहून त्या आनंदमय, सौभाग्यपूर्ण क्षणाला मुकूं नका. चुकूं नका, भुलूं नका. या विश्वांतर्गत स्थैर्याला, सृष्टि सौंदर्याला, निसर्ग माधुर्याला वास्तविक जितकी मनुष्याकडून श्रद्धापूर्ण अनन्य भक्तिपूर्वक आत्मार्पण भावानें अविरत आवाहन व आराधन यांची आवश्यकता आहे तितकीच त्याप्रीत्यर्थ वरतून त्या परब्रह्माच्या प्रसादाची पण आवश्यकता आहे. कारण त्या प्रसादाविना या विश्वांत कांहींच होणें जाणें शक्य नाहीं. कशाला सुद्धां थारावारा उरणार नाहीं. आपल्या आवाहनाची व त्या परब्रह्म प्रसादाची सांगड घालून देणारी मधली संयोजक देवता श्रीजगदंबा होय. तिच्या साक्षात्कारानें व तिच्या प्रभावानें मनुष्याचें आवाहन त्या परमपदाच्या मेघांना आकर्षण करून त्यांना वर्षाव करण्यास लावण्याइतकें पुनीत, शुद्ध सात्विक, पवित्र व समर्थ होतें. या अश्रद्धावगुंठित, संशयावलित, अज्ञानांध, अनृतपूर्ण, कष्टमयी मृत्युभूमींत सत्याचा प्रकाश, ज्ञानाचा उदय, भ्रमाचा निरास, दिव्य जीवनाचा प्रमोद, परमानंदाचा परिचय व श्रीजगदंबेच्या कृपाप्रसादामृताचा वर्षाव व्हावयाचा असेल तर तो मनुष्यानें कितीहि प्रयत्न केले, कशीहि घोर तपश्चर्या केली तरी तेवढ्यानें होण्यासारखा नाहीं. तो केवळ एक मात्र उपायानेंच होतो व होईल. आणि तो उपाय ह्मणजे श्रीजगदंबेचा अनुग्रह तिच्या सत्तेनें, तिच्या इच्छेनें, तिच्या सामर्थ्यानें, तिच्या प्रभावानेंच इहलोकी त्या आनंदाचा वर्षाव होणें शक्य आहे. त्यासाठीं तिचें आवाहन,

## जगदंबा

तिचें आराधन तिचें अधिष्ठान, तिचें पूजन, तिचें अर्चन या शिवाय मानवाला गत्यंतर नाहीं. याची जाणीव होऊन व ती दृढ राहून प्रत्येक मानवी व्यक्ति स्त्री वा पुरुष त्या जगदंबेची आराधना करण्यास प्रवृत्त होवो व त्यांत गर्क राहून यशोभागी होवो अशी श्रीनाथ चरणीं मनोभावें प्रार्थना आहे ती मान्य होवो इति शं !!!

---